मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २५७ ■ शनिवार, ३० मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# आता आरपार खेटायचं !

## मनोज जरांगे पाटील पुन्हा उपोषणाच्या मैदानात



जल भूमी

**जालना :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाचं शस्त्र उगारलं आहे. गुरुवारी माध्यमांशी बोलताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निशाणा साधत राज्य सरकारवर त्यांनी अविश्वास दाखवला. "मला आता आरपार खेटायचं आहे. मी येत्या ३० तारखेला एकटाच उन्हातानात बसणार आहे. प्रेमानं सांगितलं आणि बैठका झाल्या समजून सांगितलं तरी आरक्षण नाही. त्यामुळं आता एकदा होऊनच जाऊ द्या. मे महिन्याच्या कडक उन्हात माझ्या जीवाची लाही-लाही झाली तरी मी आता बसणार आहे. तुम्हाला खेटायचं असेल तर येत्या ३० तारखेपासून खेटू", असा कडक इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

**...असं आंदोलन देशात झालेलं नसेल :** "मुंबईत झालेल्या आंदोलनानंतर सरकारला १० महिने वेळ दिला. जाणून बुजून सरकार असं करतंय. मला कुणालाही दोष द्यायचा नाही. मी आता सीमारेषेवर आलो आहे. ३० मेच्या उपोषणात बदल केला आहे. मला कठोर उपोषण करायचं आहे. उन्हात खाटेवर उपोषण करणार आहे. उपोषणादरम्यानं माझा बळी गेला तर सरकार आणि फडणवीस यांच्यामुळं गेला असं होईल. मी मंडपात, सावलीत उपोषण करणार नाही, पाणी पिणार नाही. कोणत्याही सोईसुविधांचा वापर न करता मी ३० मेला उपोषण करणार आहे. सरकारला आम्ही किती दिवस वेळ द्यायचा आहे. जेवण, पाणी, घेणार नाही. उन्हात बाज म्हणजेच खाटेवर उपोषण करणार आहे. यात कोणताही बदल होणार नाही. अंतरवालीत कुणीही येऊ नये. सरकारला आरक्षण द्यायचं नाही. असं कठोर उपोषण देशात झालेलं नसेल असं उपोषण होणार," अशी माहिती मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितली.**मनोज जरांगे पाटील यांचा सरकारवर हल्लाबोल :** "सरकारला १० महिने वेळ दिला. आता मला चर्चा नको. चर्चा करून काय करणार. तुम्ही आमच्या मागण्या पूर्ण करणार आहेत का? आमची मते घेता, मग आरक्षण का देत नाही? मराठा आंदोलकांवरील गुन्हेही मागं घेत नाहीत. आमच्यावर गुन्हे दाखल करता आमच्यावर हल्ले करणाऱ्या पोलिसांवर गुन्हे का दाखल होत नाहीत? ओबीसींना मंत्रालय दिलं. कुणबी मंत्रालय का स्थापन केल नाही? आमच्या पाच पिढ्यांचं नुकसान कोण भरून काढणार? मला आता आर पार खेटायचं आहे. मी उन्हात रानात जाऊन उपोषणाला बसणार. माझी उन्हात लाही-लाही झाली तरी चालेल. सरकारनं संपर्क केला पण त्याला काय करता? यांनी फक्त लवालाव्या केल्या. असं क्रूर सरकार जगात कधी सत्तेत आलेलं नसेल. पश्चिम महाराष्ट्रातील मराठे सधन असल्यानं त्यांना आरक्षण दिलं जाऊ शकत नाही, असं हे म्हणतात मग तिथले ओबीसी सधन नाही का?," असं म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर हल्लाबोल केला.

**मराठ्यांकडं कोणता मंत्री गेला नाही पाहिजे, ही यांची भूमिका :** "देवेंद्र फडणवीस १०० टक्के आरक्षण देतात. मग आम्हाला का बोलवत नाही? असं प्रसाद लाड म्हणाले होते. मग द्या आता आरक्षण. आता प्रसाद लाड यांचे डोळे उघडतील. मराठ्यांबाबत यांच्या मनात द्वेष. प्रसाद लाड यांना मुख्यमंत्री फडणवीस हे दोषी आहेत असं समजलं तरी खूप झालं. हे कठोर आणि कडक उपोषण होईल. उन्हात होईल. माझा उष्माघाताचा बळी गेला तरी चालेल हे आता फायनल झालं आहे. मराठ्यांनी अंतरवालीत येऊ नये. सरकार काळजी करतंय. कुणीही राज्यात उद्रेक ,धिंगाणा करु नये. शांततेत राहावं. मला सगळ्या मागण्यांची अंमलबजावणी पाहिजे. मराठ्यांनी काळजी करु नये. राज्यातील मराठ्यांनी अंतरवालीत येऊ नये. वेळप्रसंगी माझा प्राण गेला तरी चालेल. वेगळं कोणतंही आंदोलन मराठा समाजानं करू नये. मला चर्चा नकोच मला मागण्यांची अंमलबजावणी पाहिजे," असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## चैतन्य उषा लक्ष्मण यांच्या आवाहनाला कोमसापचाही प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख एम.डी. भोईर :** कोकण गोवा मार्गाचे प्रत्यक्ष पायी चालून अभ्यासपूर्ण माहिती महाराष्ट्र राज्याला आणि रस्त्याच्या संबंधित खात्यांना छापील स्वरूपात देऊन रस्त्यामुळे भोगावा लागणारा त्रास कित्येक महिन्यांपासून सादर केलेला असताना खड्ड्यांच्या अर्धवट रस्त्यावर टोलनाके बसवून टोल वसूल केला जाणार आहे .त्या विरोधात कोकण रस्त्यावर विरोध करण्यासाठी नागरिक उतरत आहेत,काही पक्ष उतरले आहेत परंतु पेण पाटणीचा तरुण चैतन्य उषा लक्ष्मण पाटील हा कोणत्याही राजकीय पक्षाच्या माध्यमातून न उतरता रस्त्यावर स्वतः आवाज उठवित निघाला आहे.२८ मे रोजी सकाळी ११ वाजता कोकणातील काही कार्यकर्त्यांनी खारपाडा नाक्यावर सरकार विरोधात,टोल वसुली विरोधात आवाज उठवला.त्यावेळी




चैतन्य उषा लक्ष्मण यांच्या उपस्थितीत

कोकण मराठी साहित्य परिषदेचे कवी संजीव पाटील आणि कोकणातील सुप्रसिद्ध कवयित्री अक्षता गोसावी यांनी आपल्या आवाजातून जो विरोध स्पष्ट केला , त्यातून नागरिकात विरोधासाठी स्फुरण चढले

**" पयला टोल भरा "**

**रस्तं ईकासाचा नारा**

**पयला टोल भरा..**

ही संजीव पाटील यांची खड्या आवाजातील कविता आणि नंतर अक्षता गोसावी यांनी गायिलेली कविता

" मुंबई गोवा महामार्गावर सामान्यांच्या जिवाची नाय हमीअरं,आता सांग सरकारा कसा टोल भरायचा आम्ही '"टोल विरोधी वातावरण निर्माणकरून राहिली.सोबतीला उपस्थितांच्या घोषणांनी वातावरण फारच लाभले.

चैतन्य उषा लक्ष्मण यांनी हा लढा नागरिकांच्या प्रतिसादाने सनदशीर मार्गाने लढा चालूच राहील निःपक्षपणे.त्यांनी कवी कवयित्रींचे अभिनंदन केले.

कोमसापचे विश्वस्त , साहित्य रत्न प्रा. एल.बी.पाटील यांनी कोकणच्या रस्त्यावर कवींची संमेलने ठिकठिकाणी चैतन्य यांच्या सुचनेनुसार घेण्याचे ठरवित आहेत.अशा संघर्षात जनतेला उतरावे लागणार आहे.

## नागपूर महानगरपालिकेच्या वतीने अतिक्रमण हटविण्यात आले

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** म.न.पा प्रवर्तन विभाग मार्फत आज दिनांक 28.05.2026 रोजी जैन दवाखाना अमरदीप टॉकीज इतवारी परिसर येथील अंतर्गत पथक क्र ०१ अतिक्रमण निर्मूलन कारवाई सुरू आहे. ज्यामध्ये मध्ये जैन दवाखाना अमरदीप टॉकीज परिसर ते नंगा पुतला परिसर ते शुक्रवारी तलाव परिसर ते आगाराम देवी चौक परिसर ते फुले मार्केट कॉटन मार्केट परिसर समोरील संपूर्ण फळ विक्रेता व इतर यांचे संपूर्ण अतिक्रमण हटविण्यात आला व रस्ता मोकळा करण्यात आला. कारवाई मध्ये असे अंदाजे 02 ट्रक साहित्य सामान ज्यामध्ये 08




ठेले व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे व कारवाई सुरू आहे..

• सीताबर्डी परिसर येथील अंतर्गत पथक क्र ०२ आणि ०५ संयुक्तरीत्या दोन्ही पथक अतिक्रमण निर्मूलन कारवाई सुरू आहे कारवाई मध्ये सिताबर्डी मेन रोड ते व्हेरायटी चौक ते परत संपूर्ण दिवस सीताबर्डी मेन रोड पर्यंत अतिक्रमण निर्मूलन कारवाई सुरू आहे.कारवाई मध्ये रस्त्यांच्या दोन्ही बाजूस रोड व फुटपात वर असलेले अवैध ठेले व दुकान हटविण्यात येत आहे. असे अंदाजे प्लास्टिक स्टूल व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे व कारवाई सुरू आहे.

• महाल परिसर येथील अंतर्गत पथक क्र ०३ आणि ०४ दोन्ही संयुक्तरित्या पथक अतिक्रमण निर्मूलन कारवाई सुरू आहे कारवाई मध्ये महाल चौक ते बडकस चौक ते केडीबाग रोड ते गडकरी वाडा परिसर ते कल्याणेश्वर मंदिर परिसर ते परत संपूर्ण दिवस महाल आणि बडकस चौक पर्यंत अतिक्रमण निर्मूलन कारवाई सुरू आहे.कारवाई मध्ये रस्त्यांच्या दोन्ही बाजूस रोड व फुटपात वर असलेले अवैध ठेले व दुकान हटविण्यात येत आहे.

• ही कारवाई . श्री मंगेश खवले उपायुक्त प्रवर्तन विभाग, संजय कांबळे सहा. आयुक्त प्रवर्तन विभाग यांच्या मार्गदर्शनात अतिक्रमण पथक द्वारे करण्यात आली.

## मालेगाव परिसर कचऱ्याच्या विळख्यात; नागरिक त्रस्त, प्रशासन मात्र गप्प... जबाबदार कोण?”

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर , प्रतिनिधी अरविंद पांचाळ दाभडकर :** एकेकाळी स्वच्छता आणि शांततेसाठी ओळखला जाणारा मालेगाव परिसर आज अक्षरशः कचऱ्याच्या ढिगाऱ्यांनी वेढला गेला आहे. गावातील मुख्य रस्ते, चौक, गल्लीबोळ तसेच सार्वजनिक ठिकाणी साचलेल्या कचऱ्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून दुर्गंधीमुळे सामान्य नागरिकांचे जगणे असह्य झाले आहे. विशेष म्हणजे पिण्याच्या पाण्याचे नियोजन नसणे, अनेक ठिकाणी पोलवरील बंद पडलेले लाईट आणि पावसाळ्यापूर्वीच्या कामांचे कोणतेही नियोजन न दिसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



गावातील अनेक भागांत दिवसेंदिवस कचऱ्याचे ढिगारे वाढत चालले आहेत. पावसाळ्याच्या तोंडावर साचलेल्या घाणीमुळे डासांचे प्रमाण वाढले असून साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. लहान मुले, वृद्ध आणि महिलांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी जनावरे कचऱ्यात अन्न शोधताना दिसत असून प्लास्टिक व सडलेल्या वस्तूंमुळे पर्यावरणालाही मोठा धोका निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांनी ग्रामपंचायत आणि संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप केला आहे. “कर आम्ही भरतो, पण सुविधा कुठे आहेत?” असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. काही भागांत कचरा उचलणारी वाहने अनेक दिवस फिरकत नसल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

गावातील महिलांनी संताप व्यक्त करत सांगितले की, “घरासमोर इतकी घाण साचली आहे की दरवाजा उघडतानाही दुर्गंधी सहन होत नाही. मुलांना बाहेर खेळायलाही पाठवता येत नाही.” तर युवकांनी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत, “फक्त निवडणुकांच्या वेळी आश्वासने दिली जातात; पण सामान्य नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नाकडे कोणीही गांभीर्याने पाहत नाही,” अशी प्रतिक्रिया दिली.विशेष म्हणजे स्वच्छतेच्या नावाखाली लाखो रुपयांचा निधी खर्च झाल्याचे दाखवले जाते; मात्र प्रत्यक्षात गावाची अवस्था पाहता हा निधी नेमका जातो कुठे? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. आता गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून तातडीने स्वच्छता मोहीम राबवून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

मालेगाव परिसरातील ही परिस्थिती केवळ घाणीची नसून प्रशासनाच्या उदासीनतेचे जिवंत उदाहरण बनली आहे. वेळेत उपाययोजना न झाल्यास येणाऱ्या काळात आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. “स्वच्छ गाव, सुंदर गाव” ही घोषणा फक्त फलकांपुरतीच मर्यादित राहिली आहे का? असा संतप्त सवाल आता प्रत्येक नागरिक विचारत आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त १ जूनला पनवेलमध्ये भव्य सांगीतिक कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त “लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती”, “श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ” तसेच




नादब्रह्म साधना मंडळ खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक १ जून रोजी सायंकाळी ५ वाजता पनवेल येथे “स्वर संध्या” या भव्य सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला असून रसिकांसाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे.लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याचा गौरव करण्यासाठी अमृत महोत्सव वर्ष विविध उपक्रमांनी साजरे करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या “स्वर संध्या” या कार्यक्रमात संगीतप्रेमींसाठी दर्जेदार आणि सुरेल संगीताची मेजवानी अनुभवायला मिळणार आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायिका सारेगमप लिटल चॅम्प फेम अंजली गायकवाड तसेच ज्ञानेश्वरी धाडगे आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. दोन्ही कलाकारांनी आपल्या गायकीच्या जोरावर अल्पावधीतच रसिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले असून त्यांच्या सादरीकरणाची संगीतप्रेमींमध्ये उत्सुकता आहे.

कार्यक्रमाला पंडित प्रतापबुवा पाटील यांची मृदुंग साथ, प्रसाद पाध्ये यांची तबला साथ तसेच सूर्यकांत सुर्वे यांचे तालवाद्य लाभणार आहे. अनुभवी कलाकारांच्या साथसंगतीमुळे कार्यक्रमाची रंगत अधिक वाढणार आहे. याशिवाय नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ कोपरा यांच्यावतीने सुरेल भजन सादर करण्यात येणार असून गायिका शिवमाला पाटील, पखवाज वादक निलेश पाटील तसेच तबला साथीसाठी मृगेंद्र कडू हे कलाकार सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर मडके करणार आहेत. संगीत, भजन आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम असलेल्या या अविस्मरणीय मैफलीचा लाभ रसिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन “लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती”, “श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ” तसेच “नादब्रह्म साधना मंडळ खारघर” यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आत्मा अंतर्गत आयोजित नैसर्गिक शेतीशाळेमधे शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे. - सरपंच शरदभाऊ नहाटे

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/आकोट:** अकोट तालुक्यामध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक (आत्मा) अकोला डॉ. मुरली इंगळे, प्रकल्प उपसंचालक (आत्मा) डॉ.प्रेमसिंग मारग, उपविभागीय कृषी अधिकारी अकोट तुषार ढंगारे व तालुका कृषी अधिकारी अकोट एन.एस सुरडकर यांच्या मार्गदर्शनात कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अकोट अंतर्गत नैसर्गिक शेतीशाळा येत्या खरीप हंगामात राबविण्यात येणार आहेत. त्यानुसार शुक्रवार दिनांक-२९/०५/२०२६रोजी जळगाव नहाटे ता. अकोट येथे सरपंच शरदभाऊ नहाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत सोयाबीन पिकाच्या शेतीशाळेचा पहिला वर्ग संपन्न झाला. सदर शेतीशाळा वर्गामध्ये प्रगतशील शेतकरी योगेश हाडोळे व संदीप ठाकूर (प्राचार्य,ना. सौ. वसुधाताई देशमुख कृषी तंत्र विद्यालय मुंडगाव ता.अकोट) यांनी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती संकल्पना, तत्वे,सोयाबीन पिकाचे नैसर्गिक शेती पद्धतीनुसार लागवड तंत्रज्ञान व तसेच सोयाबीन पिकाच्या लागवड पूर्व करावयाच्या उपायोजनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर जळगाव नहाटे गावचे सरपंच शरदभाऊ नहाटे यांनी नैसर्गिक शेती



ही काळाची गरज व त्यापासून जमिनीकरिता तसेच मानवीय दृष्ट्या होणारे फायदे याबाबत माहिती दिली. आत्मा योजना अंतर्गत सोयाबीन पिकाच्या आयोजित शेतीशाळेतील प्रत्येक सत्रामध्ये शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे व मिळणाऱ्या माहितीचा वापर आपल्या शेतीमध्ये करावा असे आवाहन केले. सदर शेतीशाळेच्या दरम्यान शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांचे निरसन सुद्धा करण्यात आले.

सहायक तंत्रज्ञान व्यवस्थापक राहुल अडाणी यांनी कृषी विभागमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध मोहीम तसेच रासायनिक खताचा संतुलित वापर याबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली. या शेतीशाळा वर्गामधे जळगाव नहाटे येथील शेतकरी बांधव उपस्थित होते..

# दर्यापूरात काँग्रेसचे मेलोडी वाटून अनोखे आंदोलन, खासदार वानखडेंनी तहसीलदारांना दिली मेलोडी

## केंद्र व राज्य सरकारच्या वाढत्या महागाईविरोधात निषेध

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी :** केंद्र व राज्य सरकारच्या काळात वाढत चाललेल्या महागाईच्या निषेधार्थ दर्यापूर तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने बुधवारी अनोख्या पद्धतीने आंदोलन करण्यात आले. अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंतभाऊ वानखडे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस कार्यकर्त्यांनी नागरिकांना व अधिकाऱ्यांना मेलोडी चॉकलेट वाटून महागाईविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

या आंदोलनाची सुरुवात खासदार बळवंतभाऊ वानखडे यांनी दर्यापूरचे तहसीलदार रवींद्र कानडजे यांना मेलोडी चॉकलेट देऊन केली. यावेळी त्यांनी महागाईच्या मुद्द्यावर केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदवणारे निवेदनही तहसीलदारांना सादर केले.





जीवनावश्यक वस्तूंच्या किमती गगनाला भिडल्याने सामान्य जनता हैराण झाली आहे, असा आरोप यावेळी करण्यात आला.

या आंदोलनात कृ.उ.बा.स. दर्यापूरचे सभापती सुनीलभाऊ गावंडे, श्रीरंग पाटील अरबट, बाळासाहेब टोळे, दिनकरराव गायगोले, शहर काँग्रेस अध्यक्ष आतिशभाऊ शिरभाते, कृ.उ.बा.स. संचालक भारतभाऊ आठवले, काँग्रेस ग्रामीण महासचिव संजूभाऊ बेलोकार, युवक काँग्रेस महाराष्ट्र महासचिव इंजि. नितेश वानखडे, माजी न.प. सभापती शिवाजीराव देशमुख, अस्लमभाई गाणीवाले, ॲड. हेमराज धांडे यांच्यासह सागर देशमुख, राजेश्वर पाटील कोल्हे, राजू नागे, सुनील डोंगरदिवे, सचिन धुवे, साहेबराव रायबोले, प्रमोद गवई, दादा इंगळे, दिलीप गवई, तेजस नितनवरे, निलेश मेश्राम, विनोद सदाशिव, राहुल खडे, रत्नदीप वानखडे, संतोष आठवले, जगदीश कांबे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, खरेदी-विक्री संघाचे संचालक, तालुका व शहर काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, युवक काँग्रेसचे सदस्य, माजी नगरसेवक व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. 'मेलोडी खाओ, खुद जान जाओ' अशा घोषणा देत महागाईच्या विरोधात काँग्रेसने हे आंदोलन यशस्वी केले. -

**खासदार बळवंतभाऊ वानखडे म्हणाले**

"सर्वसामान्यांचे जगणे कठीण झाले आहे. पेट्रोल-डिझेल, गॅस सिलिंडर, खाद्यतेल, डाळी यांच्या किमतीने उच्चांक गाठला आहे.

सरकार मात्र 'अच्छे दिन'च्या गप्पा मारत आहे. म्हणूनच आम्ही मेलोडी देऊन सरकारला जागं करण्याचा प्रयत्न केला आहे,"

असे खासदार बळवंतभाऊ वानखडे यावेळी म्हणाले.

# शिक्षण जीवनभर घेता येते, गरीबी दूर करण्याचे साधन म्हणजे शिक्षण- राज्यपाल हरिभाऊ बागडे

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** शिक्षण हे जीवनभर घेता येते, गरीबी दूर करण्याचे साधन शिक्षण आहे. त्यामुळे शिक्षण प्रत्येकाने घेतले पाहिजे. केवळ पैसा म्हणून त्याकडे पाहू नका असे मत राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ किसनराव बागडे यांनी व्यक्त केले. 29 मे रोजी आयोजित पनवेल, शेडुंग येथील छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटीच्या तिसऱ्या दीक्षांत समारंभ वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष डॉ. केशव बडाया, प्रोफेसर केशरीलाल वर्मा, प्रोफेसर शेखर मांडे, डॉक्टर मेघेंद्र शर्मा, डॉक्टर आर पी शर्मा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रात 29 विश्वविद्यालय असून त्यापैकी हे एक विश्वविद्यालय असल्याचे सांगत त्यांनी आनंद व्यक्त केला. नर्सरीपासून शिक्षण घेतलेला विद्यार्थी पुढे आणखी हुशार होतो आणि त्याचा पाया कच्चा होतो




असे त्यांनी सांगितले. आत्ताच्या शिक्षणात पुस्तकातील धडे शिकवतात, त्याच्या बाहेर जात नाही मात्र विद्यार्थ्यांनी त्याच्या बाहेर गेले पाहिजे. विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढली पाहिजे तसेच एमपीएससी, यूपीएससीच्या परीक्षा विद्यार्थ्यांनी दिल्या पाहिजेत आणि विद्यार्थ्यांकडे संयम पाहिजे असे बागडे यांनी सांगितले. आपल्या मनात कोणतीच गोष्ट आली नाही तर काहीही होणार नाही असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी भारतीय संस्कृतीबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

डॉ केशव बडाया यांनी या दीक्षांत समारंभाला राज्यपाल हरिभाऊ बागडे उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभार मानले तसेच डिग्री मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आयएएस अजिताभ शर्मा यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच करियरबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्याने स्वतःची तुलना दुसऱ्यासोबत करू नका. या युगात काहींना यश मिळेल काहींना अपयश येईल, मात्र हताश न होण्याचा सल्ला त्यांनी दिला.

या पदवीदान समारंभ दरम्यान विद्यापीठाच्या विविध संकुलातील पदवी आणि पदव्युतर विद्यार्थ्यांना एकूण 1 हजार 268 पदव्या प्रदान करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. तसेच 34 संशोधकांना पीएचडी प्रदान करण्यात आली तर विविध अभ्यासक्रमांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना 37 सुवर्ण पदके देऊन सन्मानित करण्यात आले.

# मेलोडी वाटपातून काँग्रेसचा महागाईविरोधात अनोखा निषेध आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** केंद्र व राज्य सरकारच्या वाढत्या महागाई धोरणांविरोधात दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने अनोख्या पद्धतीने निषेध आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी नागरिकांना "मेलोडी" वाटप करून महागाईचा मुद्दा अधोरेखित केला. या आगळ्यावेगळ्या आंदोलनामुळे शहरात मोठी चर्चा रंगली.काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केंद्र सरकारच्या धोरणांमुळे जीवनावश्यक वस्तू, इंधन, गॅस तसेच दैनंदिन गरजेच्या



वस्तूंच्या किंमती सातत्याने वाढत असल्याचा आरोप करत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी तहसील कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला. आंदोलनानंतर तहसीलदार रवींद्र कानडजे यांना मेलोडी डेट व निवेदन देऊन वाढत्या महागाईबाबत निषेध नोंदविण्यात आला.

या आंदोलनात सुनीलभाऊ गावंडे (सभापती, कृ.उ.बा.स. दर्यापूर), श्रीरंग पाटील अरबट, बाळासाहेब टोळे, दिनकर रावजी गायगोले, आतिशभाऊ शिरभाते (शहराध्यक्ष, काँग्रेस कमिटी दर्यापूर), भारतभाऊ आठवले (संचालक, कृ.उ.बा.स. दर्यापूर), संजूभाऊ बेलोकार (महासचिव, काँग्रेस कमिटी अमरावती ग्रामीण), इंजि. नितेश वानखडे (महासचिव, युवक काँग्रेस महाराष्ट्र), शिवाजीराव देशमुख (माजी सभापती, नगर परिषद दर्यापूर), अस्लमभाई गाणीवाले, सागर देशमुख (तालुकाध्यक्ष, काँग्रेस दर्यापूर) यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, खरेदी-विक्री संघाचे पदाधिकारी, युवक काँग्रेसचे सदस्य, नगरसेविका व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले असून केंद्र व राज्य सरकारने तातडीने महागाई नियंत्रणासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली. आंदोलन शांततेत व उत्साहपूर्ण

# मोरबे–करंजाडे महामार्ग अलाइनमेंट मंजुरीच्या स्थितीत; मोरबे सर्कल नवी मुंबई विमानतळाजवळील सर्वात मोठे विकास हब ठरण्याची शक्यता

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया यांच्या वडोदरा–मुंबई एक्सप्रेसवे स्पर पॅकेज XVIII अंतर्गत मोरबे ते करंजाडे / मुंबई–पुणे एक्सप्रेसवे या नवीन महामार्ग कनेक्टिव्हिटीची अलाइनमेंट मंजुरीच्या स्थितीत असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. या प्रस्तावित मार्गाची लांबी सुमारे 9.464 किलोमीटर असून, हा मार्ग ग्रीनफिल्ड 8-लेन कनेक्टिव्हिटी म्हणून विकसित होण्याची शक्यता आहे.

या अलाइनमेंटमुळे मोरबे सर्कल हे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील सर्वात मोठे विकास हब आणि महत्त्वाचे सर्कल ठरण्याची शक्यता आहे. मोरबे सर्कलमधून नवी मुंबई विमानतळ, मुंबई–पुणे एक्सप्रेसवे, जेएनपीटी, तळोजा एमआयडीसी, नैना क्षेत्र, लॉजिस्टिक पार्क, डेटा सेंटर आणि नियोजित टाऊनशिप विकास यांना मजबूत कनेक्टिव्हिटी मिळू शकते. या मार्गामुळे तळोजा, मोरबे, वांगणी तर्फे तळोजा आणि पनवेल परिसरातील पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळेल. भविष्यात या भागात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, औद्योगिक विकास, लॉजिस्टिक सुविधा आणि नियोजित शहरीकरण वाढण्याची शक्यता आहे.

प्रकाश बाविस्कर, अध्यक्ष, नैना बिल्डर वेल्फेअर असोसिएशन यांनी सांगितले की, मोरबे ते करंजाडे ही प्रस्तावित महामार्ग कनेक्टिव्हिटी या संपूर्ण परिसरासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. ही अलाइनमेंट मंजूर झाल्यास मोरबे सर्कलचे महत्त्व अनेक पटींनी वाढेल.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जवळ असलेले मोरबे सर्कल भविष्यात या भागातील सर्वात मोठे विकास हब आणि प्रमुख कनेक्टिव्हिटी सर्कल ठरू शकते.

वांगणी तर्फे तळोजा आणि तळोजा-मोरबे परिसरात आधीच नियोजित विकासाची मोठी क्षमता आहे. या नवीन कनेक्टिव्हिटीमुळे या भागातील जमीन, टाऊनशिप, लॉजिस्टिक, डेटा सेंटर आणि औद्योगिक गुंतवणुकीचे महत्त्व आणखी वाढणार आहे. मोरबे–करंजाडे महामार्ग अलाइनमेंट मंजुरीच्या स्थितीत आल्यास नवी मुंबई विमानतळ परिसराच्या विकासाला नवी दिशा मिळू शकते. या कनेक्टिव्हिटी मुळे मोरबे सर्कल हे नवी मुंबई विमानतळाजवळील भविष्यातील सर्वात मोठे विकास केंद्र म्हणून पुढे येण्याची शक्यता आहे.

# मा.नामदेव ठोंबरे यांची बारामती तालुका युवक संघटकपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** :ढेकळवाडी (ता. बारामती) येथील सामाजिक कार्यकर्ते नामदेव ठोंबरे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) पक्षाच्या बारामती तालुका युवक संघटकपदी निवड करण्यात आली आहे.युवा नेते तथा विद्या प्रतिष्ठान बारामतीचे खजिनदार युगेंद्र पवार यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. देशाचे नेते,पक्षाचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार,पक्षाच्या कार्याध्यक्षा तथा महासंसदरत्न खासदार सुप्रिया सुळे आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांच्या मान्यतेने ही नियुक्ती करण्यात आली आहे.यावेळी पक्षाच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या विकासासाठी भरीव काम करून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याची



अपेक्षा व्यक्त करण्यात आली. मा.नामदेव ठोंबरे यांच्या निवडीमुळे बारामती तालुक्यातील युवक कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.मा.नामदेव ठोंबरे यांनी पक्ष नेतृत्वाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार मानत, पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी तसेच युवकांना पक्षाशी जोडण्यासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# सिल्लोडमध्ये प्रहार शेतकरी संघटनेचे माजी जिल्हाप्रमुख अनिल पालोदे शिवसेनेत

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदक जिल्हा प्रतिनिधी :** प्रहार शेतकरी संघटनेचे माजी जिल्हाप्रमुख अनिल पालोदे (रा. चांदापूर) यांनी आपल्या समर्थकांसह शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. राज्याचे उद्योगमंत्री तथा शिवसेना उपनेते व प्रवक्ते उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सिल्लोड-सोयगाव मतदारसंघाचे आमदार अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत त्यांनी शिवबंधन बांधले.

काल शुक्रवारी सिल्लोड



येथे आयोजित शिवसेना पक्षाच्या भव्य कार्यकर्ता मेळाव्यात हा प्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड, तालुकाप्रमुख केशवराव तायडे, तसेच स्थानिक पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रवेशावेळी बोलताना अनिल पालोदे म्हणाले की, आमदार अब्दुल सत्तार यांच्या विकासकामांची गती, त्यांचा दांडगा जनसंपर्क आणि शेतकरी हितासाठीची त्यांची भूमिका यामुळे आपण शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

ग्रामीण भागातील विकास, प्रलंबित शेतकरी प्रश्न सोडविण्याची भूमिका आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांना मिळणारे बळ हे या निर्णयामागचे मुख्य कारण आहे. याप्रसंगी तालुकाध्यक्ष योगेश पालोदे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला.

# महागाव नगर पंचायतमध्ये रोजगार हमी योजना प्रभावीपणे राबविण्याची जोरदार मागणी

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे (यवतमाळ ) :** महागाव नगर पंचायत क्षेत्रातील बेरोजगार युवक, शेतकरी व शेतमजुरांना स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी योजना तात्काळ आणि प्रभावीपणे राबविण्यात यावी, अशी जोरदार मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी शहरप्रमुख तेजस पाटील नरवाडे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी नगर पंचायत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

महाराष्ट्र शासनाच्या ०३ मार्च २०१४ च्या शासन निर्णयानुसार "क" वर्ग नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्रात रोजगार हमी योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पात्र नागरिकांना



रोजगार उपलब्ध करून देणे तसेच विकासकामांना गती देणे ही स्थानिक प्रशासनाची जबाबदारी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. महागाव परिसरातील शेतकरी व मजूर वर्गाला रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी तसेच शेतीपूरक विकासकामांना चालना मिळावी यासाठी शेतरस्ते, पाणंद रस्ते, नाले खोलीकरण, जलसंधारण, शेततळे, वृक्षारोपण, विहिरी व बंधारे यांसारखी कामे प्राधान्याने हाती घेण्याची मागणी करण्यात आली आहे.ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करून आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी रोजगार हमी योजना प्रभावीपणे राबविणे काळाची गरज असल्याचे मत तेजस नरवाडे यांनी व्यक्त केले. प्रशासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

# भारताच्या सेमीकंडक्टर मिशन अंतर्गत कुशल मनुष्यबळासाठी विद्यापीठाची साथ विद्यापीठात बी.एस्सी. सेमीकंडक्टर मटेरियल्स अँड डिव्हाइसेस अभ्यासक्रम सुरू

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने बी.एस्सी. सेमीकंडक्टर कार्यक्रमांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या उज्ज्वल आणि सातत्याने विस्तारत असलेल्या करिअर संधींवर विशेष भर दिला आहे. विशेषतः भारत सरकारच्या इंडिया सेमीकंडक्टर मिशन (ISM) च्या पार्श्वभूमीवर या संधी अधिक व्यापक होत आहे. यामुळे विद्यापीठाने कुशल मनुष्यबळ विकसित करण्यासाठी बी.एस्सी. सेमीकंडक्टर मटेरियल्स अँड डिव्हाइसेस अभ्यासक्रम सुरू केला आहे.

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत राबविण्यात येणारे हे मिशन भारतातील सेमीकंडक्टर आणि डिस्प्ले परिसंस्थेला बळकटी देणे. आयातीवरील अवलंबित्व कमी करणे तसेच चिप डिझाइन, फॅब्रिकेशन, पॅकेजिंग आणि संबंधित तंत्रज्ञानांसाठी कुशल देशांतर्गत मनुष्यबळ निर्माण करणे, या उद्देशाने कार्यरत आहे. भारताचा सेमीकंडक्टर क्षेत्र सध्या निर्णायक वाढीच्या टप्प्यात प्रवेश करत आहे. मोठ्या प्रमाणावरील सार्वजनिक गुंतवणूक आणि नव्या औद्योगिक तसेच संशोधन पायाभूत सुविधांच्या उभारणीमुळे या क्षेत्राला गती मिळत आहे. इंडिया सेमीकंडक्टर मिशन हे फॅब्रिकेशन सुविधा, डिझाइन, क्षमता आणि प्रगत उत्पादन व्यवस्था उभारण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी आखण्यात आले आहे. त्याचबरोबर नवोन्मेष, जागतिक सहकार्य आणि संपूर्ण परिसंस्थेच्या विकासालाही या उपक्रमाद्वारे चालना दिली जात आहे. या विस्तारामुळे भौतिकशास्त्र, पदार्थ विज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स आणि उपकरण तंत्रज्ञानातील प्रशिक्षित पदवीधरांची मागणी लक्षणीयरीत्या वाढण्याची अपेक्षा आहे.

भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक तथा कार्यक्रम समन्वयक डॉ. स्मिता आचार्य यांनी अभ्यासक्रमाविषयी अधिक माहिती देताना बी.एस्सी. सेमीकंडक्टर कार्यक्रम विद्यार्थ्यांना घन-अवस्था भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक पदार्थ, सेमीकंडक्टर उपकरण संकल्पना, नॅनोटेक्नॉलॉजी आणि



वैशिष्ट्यीकरण तंत्रे यांचा भक्कम करीत असल्याचे सांगितले. असे प्रशिक्षण भारतातील उदयोन्मुख सेमीकंडक्टर परिसंस्थेच्या गरजांशी थेट सुसंगत आहे. या क्षेत्रात केवळ फॅब्रिकेशन युनिट्समध्येच नव्हे तर चाचणी, प्रक्रिया नियंत्रण, गुणवत्ता हमी, क्लीनरूम कार्यपद्धती, सिम्युलेशन, मेट्रोलॉजी आणि संशोधन प्रयोगशाळांमध्येही प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यामुळे पदवीधर सेमीकंडक्टर मूल्यसाखळीतील औद्योगिक उत्पादन तसेच नवोन्मेषाधारित विकास या दोन्ही क्षेत्रांत या अभ्यासक्रमातील विद्यार्थी योगदान देऊ शकतात.

**बी.एस्सी. सेमीकंडक्टर पदवीधरांसाठी करिअर संधी**

सेमीकंडक्टर उत्पादन आणि फॅब्रिकेशन.

चिप चाचणी, पॅकेजिंग आणि व्हॅलिडेशन.

इलेक्ट्रॉनिक्स आणि एम्बेडेड सिस्टीम्स उद्योग.

पदार्थ वैशिष्ट्यीकरण आणि नॅनोटेक्नॉलॉजी प्रयोगशाळा.

सौर ऊर्जा आणि नवीकरणीय ऊर्जा तंत्रज्ञान.

उपकरणनिर्मिती, गुणवत्ता नियंत्रण आणि मेट्रोलॉजी.

संशोधन आणि विकास संस्था.

सिम्युलेशन आणि डेटा-आधारित अभियांत्रिकी सहाय्य.

हा कार्यक्रम देशाच्या स्वावलंबी सेमीकंडक्टर परिसंस्था निर्माण करण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टाशी अत्यंत सुसंगत आहे. इंडिया सेमीकंडक्टर मिशन केवळ मोठ्या औद्योगिक प्रकल्पांपुरते मर्यादित नसून, ते मानवी भांडवलाची निर्मिती, डिझाइन क्षमता बळकट करणे आणि भारताच्या दीर्घकालीन तांत्रिक सार्वभौमत्वाला पाठबळ देऊ शकणाऱ्या कुशल तांत्रिक मनुष्यबळाची साखळी तयार करण्यावरही भर देते. या दृष्टीने, सेमीकंडक्टर विज्ञानातील पदवी शिक्षण हे केवळ पारंपरिक पदवी म्हणून न पाहता एक रणनीतिक शैक्षणिक उपक्रम म्हणून महत्त्वाचे ठरणार आहे.

हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षण आणि विशेषीकरणाच्या संधीही उपलब्ध राहतील. एम.एस्सी., एम.टेक., एम.बी.ए. आणि पीएच.डी. कार्यक्रमांद्वारे ते संशोधन, उत्पादन विकास, सेमीकंडक्टर डिझाइन, शैक्षणिक अध्यापन आणि तंत्रज्ञान व्यवस्थापन क्षेत्रात प्रगती करू शकतील. त्यामुळे त्यांची रोजगारक्षमता आणि दीर्घकालीन करिअर वाढ अधिक बळकट होईल. माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी हा अभ्यासक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. भविष्याभिमुख शैक्षणिक उपक्रमांद्वारे विद्यापीठ देशाच्या सेमीकंडक्टर मनुष्यबळ विकासात अर्थपूर्ण योगदान देण्याचा आणि भारताला जागतिक तंत्रज्ञान नेतृत्वाकडे नेण्याच्या प्रवासात मदत करण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच, विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी हा कार्यक्रम आधुनिक अर्थव्यवस्थेतील सर्वात रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाच्या क्षेत्रांपैकी एका क्षेत्रात प्रवेश करण्यासाठीची संधी म्हणून पाहावी, असेही आवाहन विद्यापीठाने केले आहे.

---

# समृद्ध पंचायतराज अभियानात टेंभी ग्रामपंचायतीची दमदार झेप

## जिल्हास्तरीय समितीकडून विकासकामांचे कौतुक

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे (यवतमाळ )** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पंचायत समिती राजुरा व जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्या तालुकास्तरीय मूल्यमापनात प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या ग्रामपंचायत टेंभी येथे आज जिल्हास्तरीय मूल्यमापन समितीने भेट देऊन विविध विकासकामांची पाहणी केली.

यावेळी जिल्हा परिषद गडचिरोलीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. सुहास गाडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पंकज भोयर तसेच कार्यकारी अभियंता (ग्रा.पा. पु.) श्री. विनोद उद्धरवार यांनी ग्रामपंचायतीच्या विविध योजनांचे व विकासकामांचे सविस्तर मूल्यमापन केले.

ग्रामपंचायतीच्या स्वच्छता, पाणीपुरवठा, शिक्षण, ग्रामविकास तसेच नागरिकाभिमुख



उपक्रमांचे समितीने कौतुक केले.

या प्रसंगी महागाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दतराव कदम, विस्तार अधिकारी सुरेश चव्हाण, नागरगोजे, देशमुख, ग्रामविकास अधिकारी राजुरे व वेरुळकर, मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, अमोल चिकने, सरपंच तथा सरपंच, तथा तालुका महागाव सरपंच संघटनेचे अध्यक्ष, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, कर्मचारी तसेच आशा सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

---

# आ . प्रमोद जठार यांनी महापौर रितू तावडे यांच्या भेटीत विविध विषयांवर चर्चा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : आ. प्रमोद शंताराम जठार यांनी शुक्रवारी मुंबईच्या महापौर रितू तावडे यांची सदिच्छा भेट घेऊन मुंबईतील महिला सक्षमीकरण, आरोग्य व्यवस्था, पायाभूत सुविधा आणि पर्यटन विकासाशी संबंधित चार महत्त्वपूर्ण विषयांवर आज सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी विविध मागण्यांचे निवेदन महापौरांकडे सादर केले. त्यानंतर बृहन्मुंबई भाजपा कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी या मागण्यांची माहिती माध्यम प्रतिनिधींना दिली. मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक आणि लोकाभिमुख उपक्रमांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी जठार यांनी नमूद केले.महिला बचत गटांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मुंबईतील प्रमुख ठिकाणी "कोकण हाट" किंवा "महिला बचत गट केंद्र" उभारण्यात यावे, अशी प्रमुख मागणी आमदार जठार यांनी केली. सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या पारंपरिक खाद्यपदार्थ, हस्तकला आणि विविध उत्पादनांना मुंबईत कायमस्वरूपी विक्री केंद्र उपलब्ध झाल्यास हजारो महिलांना आर्थिक स्थैर्य, स्वावलंबन आणि रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील, असे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील महिलांच्या उत्पादनांना शहरी बाजारपेठ उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी 'रुग्ण कल्याण निधी' स्थापन करण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली. मुंबईकरांच्या सेवेसाठी दिवस-रात्र कार्यरत असलेल्या अनेक कर्मचाऱ्यांना गंभीर आजारांवर उपचार करताना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे पालिकेच्या माध्यमातून



विशेष 'कामगार कल्याण निधी' उभारून कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना तातडीची आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. कर्मचाऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेला प्राधान्य दिल्यास त्यांच्या कामाच्या कार्यक्षमतेतही वाढ होईल, असे त्यांनी नमूद केले. याशिवाय मुंबईतील केईएम, नायर, सायन आणि टाटा हॉस्पिटलमध्ये राज्यभरातून लाखो रुग्ण उपचारासाठी येत असतात. या रुग्णांसोबत येणाऱ्या नातेवाईकांना राहण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना रस्त्यावर, फुटपाथवर किंवा उघड्यावर रात्री काढाव्या लागतात. या पार्श्वभूमीवर संबंधित रुग्णालयांच्या परिसरात तातडीने 'नाईट शेल्टर' उभारून स्वच्छ निवारा, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी जठार यांनी केली. या निर्णयामुळे हजारो गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळेल, असे त्यांनी सांगितले.पर्यटन विकासाच्या दृष्टीने मुंबईतील गोराई आणि भायखळा येथील राणीबाग परिसरासाठी 'मिनी टॉय ट्रेन' सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्तावही त्यांनी मांडला. गोराई ते मनोरी दरम्यान सुरू होणाऱ्या या प्रकल्पामुळे पर्यटकांना आकर्षक, सुरक्षित आणि प्रदूषणमुक्त वाहतूक सुविधा उपलब्ध होईल. यामुळे या परिसरातील पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल तसेच स्थानिक कोळी बांधव, युवक आणि नागरिकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुंबईच्या पर्यटन विकासात हा प्रकल्प महत्त्वाचा टप्पा ठरेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

---

# इंधनाची ३३ टक्के अधिक मागणी होऊनही इंडियन ऑईलकडून इंधनाचा पुरवठा सुरळीत

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : जगभरातील सप्लाय चेनमधील अडचणींनंतर महाराष्ट्रात मे २०२६ मध्ये इंधनाची मोठ्या प्रमाणात अधिक मागणी होऊनही इंडियन ऑईलने इंधन पुरवठा सुरळीत राखला आहे. इंडियन ऑईलने महाराष्ट्रातील सर्व आऊटलेटवर नियोजनबद्ध कार्यप्रणाली आणि प्रभावी लॉजिस्टिकचा समन्वय राखत प्रत्येक ग्राहकाला दररोज पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा सुरळीत व अखंड पुरवठा सुनिश्चित केला आहे.

ग्राहकांना दररोज २४ तास इंधनाचा पुरवठा करण्यासाठी इंडियन ऑईलने विशेष कार्यप्रणाली विकसित केली असल्यामुळे मागणीत वाढ होऊनही त्याचा पुरवठ्यावर परिणाम झालेला नाही. मे २०२६ मध्ये महाराष्ट्रातील पेट्रोलच्या किरकोळ विक्रीत मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत २२ टक्के वाढ झाली असून, डिझेलच्या किरकोळ विक्रीत ३३ टक्क्यांची भक्कम वाढ नोंदविण्यात आली आहे.

या वाढीमागे इतर पुरवठादारांच्या तुलनेत किंमतीतील फरकामुळे संस्थात्मक आणि व्यावसायिक ग्राहकांचा इंडियनऑईलच्या रिटेल आऊटलेट्सकडे वाढता कल तसेच हंगामी शेतीसंबंधित उपक्रमांमुळे निर्माण झालेली वाढती मागणी हे प्रमुख घटक आहेत.

असे असले तरी मागणीत वाढ होऊनही इंधन पुरवठ्यात कोणताही खंड पडलेला नाही.

देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची इंडियनऑईलने पुन्हा एकदा खात्री दिली आहे. अखंड सेवा आणि सामूहिक जबाबदारीच्या भावनेतून इंधनपुरवठा सुरळीत, अडथळामुक्त आणि सातत्यपूर्ण राहावा यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

भारताच्या गतिमान प्रवासामागे असे एक जाळे कार्यरत आहे जे कधीच थांबत नाही — शेतापासून महामार्गांपर्यंत, डोंगरांपासून किनारपट्टीपर्यंत, कठीण भूप्रदेशांपासून आव्हानात्मक सीमावर्ती भागांपर्यंत इंडियनऑईल जागतिक अनिश्चिततेच्या काळातही अखंड इंधनपुरवठा सुनिश्चित करत आहे.

नागरिकांनी नेहमीप्रमाणेच इंधन खरेदी सुरू ठेवावी आणि कोणत्याही प्रकारची अनावश्यक घबराट किंवा अतिरिक्त साठेबाजी टाळावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

देश विश्वासावर चालतो आणि आम्ही आमच्या बांधिलकीवर. इंधन उपलब्धतेबाबत अचूक माहिती मिळवण्यासाठी ग्राहकांनी केवळ इंडियनऑईल आणि अधिकृत संस्थांकडून जारी करण्यात येणाऱ्या अधिकृत माहितीलाच विश्वास द्यावा, असेही आवाहन कंपनीकडून करण्यात आले आहे.

---

# रहीमाबाद येथे कै. दादाराव पाटील यांच्या स्मृतींना कीर्तनातून भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील रहीमाबाद येथील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्व कै. दादाराव सांडू पाटील गाढवे यांच्या उत्तर कार्यानिमित्त आयोजित ह.भ.प. अजबराव मिरगे महाराज (आसडीकर) यांचे हरिकीर्तन मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून पाटील यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कीर्तनाचे निरूपण करताना ह.भ.प. अजबराव महाराज म्हणाले की, "माणूस किती वर्षे जगला, यापेक्षा तो कसा जगला, याला जीवनात अधिक महत्त्व आहे. स्वार्थासाठी जगण्यापेक्षा समाजासाठी जगणाऱ्या व्यक्तीची कीर्तीच मृत्यूनंतर शिल्लक राहते." संत तुकाराम महाराजांच्या 'तुका म्हणे एका मरणची सरे | उत्तमची पुरे कीर्ती मागे ||' या अभंगाचा आधार घेत त्यांनी कै. दादाराव पाटील यांच्या सामाजिक व राजकीय जीवनपटावर प्रकाश



टाकला. पाटील यांचे विविध क्षेत्रांतील योगदान तरुण पिढीसाठी सदैव प्रेरणादायी राहील, असे प्रतिपादन त्यांनी केले.

या सोहळ्यात गायनाचार्य ह.भ.प. अमोल महाराज मिरगे, ह.भ.प. दत्ता महाराज बोराडे आणि मृदंगाचार्य ह.भ.प. विशाल महाराज बर्डे यांनी आपल्या भक्तीमय सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमास परिसरातील राजकीय, आध्यात्मिक, कृषी, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवरांसह गावातील भजनी मंडळी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# अंभई घाटात सराफ व्यापाऱ्याला लुटणारी टोळी जेरबंद ; गावठी कट्ट्यासह पावणे सात लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर** :-अंभई घाटात चाकूचा धाक दाखवून सराफा व्यापाऱ्याला लुटणाऱ्या सराईत टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छडा लावला आहे. पोलिसांनी या टोळीतील तिन्ही आरोपींना जेरबंद केले असून, त्यांच्याकडून गावठी कट्ट्यासह ६ लाख ६९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

फिर्यादी नितीन सोनाजी निकम (वय ३०, रा. पालोद, ता. सिल्लोड) हे सराफ व्यावसायिक आहेत. २० मे २०२६ रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ते दुचाकीवरून अंभई येथून उंडणगाव मार्गे पालोदकडे जात होते. दरम्यान, अंभई घाटात आरोपींनी त्यांच्या दुचाकीला अडवून चाकूचा धाक दाखवला, त्यांना मारहाण केली आणि त्यांच्याकडील सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल जबरदस्तीने हिसकावून पळ काढला. या प्रकरणी अजिंठा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी तात्काळ तपासाचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक विजयसिंग राजपूत यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे दत्ता सुनील राऊत (वय २६, रा. मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर) याला बिडकीन टोलनाक्यावरून ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली देत



साथीदार रोशन ऊर्फ सोनू कैलास सुरडकर (रा. वालसांवगी, ह.मु. बिडकीन) आणि लखन शालीग्राम सूर्यवंशी (वय २३, रा. जनुना, ता. जि. बुलढाणा) यांची नावे सांगितली. पोलिसांनी सापळा रचून तिघांनाही अटक केली. झडती घेतली असता आरोपींकडे गावठी कट्टा व लुटलेला मुद्देमाल मिळून आला.

**सराईत गुन्हेगारांचे रेकॉर्ड**

अटक केलेले तिन्ही आरोपी सराईत गुन्हेगार आहेत. दत्ता राऊत याच्यावर बुलढाणा शहर, चिकलठाणा आणि मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात, तर रोशन सुरडकर याच्यावर पारध (जालना) पोलीस ठाण्यात हत्येचा प्रयत्न आणि मारहाणीचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. लखन सूर्यवंशी याच्यावरही बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्यांची नोंद आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक विजयसिंग राजपूत, सपोनि पवन इंगळे, सुधीर मोटे, संतोष मिसळे आणि पोलीस अंमलदार रवींद्र लोखंडे, विष्णू गायकवाड, सचिन सोनार, शिवानंद बनगे, अशोक वाघ, अनिल काळे, महेश बिरुटे, आनंद घाटेश्वर, योगेश तरमळे, जीवन घोलप, चालक संजय तांदळे, योगेश कुडे व महिला अंमलदार जनाबाई चव्हाण तसेच अजिंठा पोलीस ठाण्याचे सपोनि अमोल ढाकणे व पोउपनि इंगळे यांच्या पथकाने केली.

पुढील तपास अजिंठा पोलीस करत आहेत.

# भंडारा-गोंदिया विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-2026 अनुषंगाने जिल्हादंडाधिकारी यांनी विविध आदेश निर्गमित केले आहेत

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाने भंडारा-गोंदिया विधान परिषदेसह महाराष्ट्र विधान परिषदेच्या 16 स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक-2026 ची सोमवार 18 मे 2026 रोजी घोषणा केली आहे. या घोषणेच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे.

भंडारा गोंदिया जिल्ह्यात विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक-2026 ची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पडावी या दृष्टीकोणातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये जिल्हादंडाधिकारी यांनी विविध आदेश निर्गमीत केले आहेत. हा आदेश निर्गमीत केल्याच्या दिनांकापासून 25 जून 2026 रोजी 24 वाजेपर्यंत जिल्ह्यात लागू राहील.

शासकीय-निमशासकीय विश्रामगृहाचा वापर

शासकीय व निवडणुकीच्या कामावर असलेले अधिकारी-कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस भंडारा जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय विश्रामगृहाचा वापर करणे संबंधित विभागाने अधिकृत परवाना असल्याशिवाय किंवा सक्षम अधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय प्रवेश करण्यास प्रतिबंध केले आहे.

ध्वनिक्षेपक-ध्वनिवर्धकाचा वापर नियमन व नियंत्रण

कोणतीही व्यक्ती, संस्था, पक्ष व पक्षाचे कार्यकर्ते यांना ध्वनीक्षेपक व ध्वनिवर्धकाचा वापर सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही. फिरत्या वाहनांवर ध्वनीक्षेप व ध्वनिवर्धकाचा वापर करता येणार नाही. महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग, शासन निर्णय 31 जुलै 2013 नुसार ध्वनीक्षेपक व ध्वनिवर्धकाचा वापर ध्वनी प्रदूषणाची पातळी विहित मर्यादेत राखून करावी. ध्वनीक्षेपक व ध्वनिवर्धकाचा वापर सकाळी 6 वाजेपुर्वी आणि रात्री 10 वाजेनंतर करता येणार नाही.

शासकीय वाहनाच्या गैरवापरास प्रतिबंध

भंडारा जिल्ह्यामध्ये निवडणूक कालावधीत कोणत्याही वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटारगाड्या अथवा वाहने वापरण्यास प्रतिबंधीत केले आहे.

वाहनांवर पक्ष प्रचाराचे कापडी फलके, झेंडे लावणे आदी बाबींसाठी प्रतिबंध

जिल्ह्यात निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावणे इत्यादी बाबीसाठी प्रतिबंध करण्यात आले आहे. फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रीन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून 2 फुट उंचीपेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनावर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूनेच लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. फिरत्या वाहनावर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी यांच्या वाहनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनावर लावता येणार नाही.

सार्वजनिक ठिकाणी पक्षांचे फलके, भाषण देण्यावर निर्बंध

भंडारा जिल्हा हद्दीत निवडणूक कालावधीत सार्वजनिक ठिकाणी पक्षांचे चित्रे, चिन्हांचे कापडी फलके, सार्वजनिक ठिकाणी भाषण देण्यास या आदेशाद्वारे प्रतिबंधीत केले आहे.

मालमत्तेची विरूपता करण्यास निर्बंध

निवडणुकीचे कालावधीत शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विरूपता करण्यास याद्वारे प्रतिबंधीत केले आहे.

धरणे-आंदोलन, मोर्चा इत्यादीवर निर्बंध

भंडारा जिल्ह्यामधील सर्व शासकीय, निमशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेची कार्यालये, विश्रामगृह या ठिकाणी कोणत्याही प्रकारची मिरवणूक, मोर्चा काढणे, सभा घेणे, उपोषण करणे, घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे, कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणे, सत्याग्रह करणे तसेच धरणे-आंदोलन करण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे.

शस्त्रे बाळगणे व वाहून नेण्यावर निर्बंध

शस्त्र अधिनियम 1959 चे कलम 22 (1) (ख) नुसार आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणुकीचे कालावधीत शासकीय कर्तव्य पार पाडणारे अधिकारी व कर्मचारी तसेच बँकेचे सुरक्षा गार्ड यांच्या व्यतिरिक्त इतर सर्व परवानाधारकास परवान्यातील शस्त्रास्त्रे बाळगण्यास व वाहून नेण्यास या आदेशाद्वारे प्रतिबंध केले आहे.

# "माता रमाईंच्या त्यागातून संविधानाला बळ, नेहरूंच्या नेतृत्वातून देशाला दिशा"

## वाशीमच्या अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालयात अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : माता रमाई आंबेडकर आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या स्मृतीदिनानिमित्त वाशीम शहरातील संतोषी माता नगर परिसरातील अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालयात भावपूर्ण अभिवादन कार्यक्रम पार पडला. दि. २७ मे रोजी सायंकाळी ६:३० वाजता आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान माता रमाई आंबेडकर यांच्या त्यागमय जीवनाचा तसेच पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार होते. यावेळी डायमंड कोचिंग क्लासेसचे संचालक माधव डोंगरदिवे, सेवानिवृत्त शिक्षक आर.पी. कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, आदर्श ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन तसेच समाजभूषण पुरस्कार प्राप्त प्रविण




पट्टेबहादूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. उपस्थित मान्यवरांनी माता रमाई आंबेडकर व पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

कार्यक्रमात बोलताना राजकुमार पडघान यांनी माता रमाई आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकत सांगितले की, "माता रमाईंचा त्याग, शांतता आणि सहनशीलतेमुळेच डॉ.बाबासाहेब यांना देशासाठी अखंड कार्य करता आले. त्यांच्या पाठीशी उभ्या राहिलेल्या रमाईंच्या संघर्षामुळेच देशाला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय देणारे भारतीय संविधान प्राप्त झाले." त्यांनी पुढे सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेले भारतीय संविधान तत्कालीन प्रधानमंत्री पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळाला स्वाधीन करून देशात समानतेची पायाभरणी केली. त्याच संविधानाच्या माध्यमातून पंडीत नेहरू यांनी आधुनिक भारताची उभारणी केली.

यावेळी माधव डोंगरदिवे, प्रविण पट्टेबहादूर, अरविंद पडघन तसेच आर.पी. कांबळे यांनीही माता रमाई आंबेडकर आणि पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी पैलूंवर सविस्तर भाष्य केले. देशातील सामाजिक समता, शिक्षण, लोकशाही आणि राष्ट्रनिर्मितीसाठी दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांचे योगदान अविस्मरणीय असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन समाधान अवचार यांनी केले. कार्यक्रमाला विश्वनाथ पडघान, अशोक अडागळे, दादाराव इंगोले, अजय अवचार, ज्योत्स्ना अवचार, शुभांगी कबाडे, आर्यन बर्डे, विशाखा बरडे, रेखा सावदेकर, प्राची बरडे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी माता रमाई आंबेडकर व पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या कार्याला अभिवादन करून त्यांच्या विचारांचा समाजात प्रसार करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# नदीजोड प्रकल्पाअंतर्गत समुद्रात वाहून जाणारे पाणी आष्टी पाटोदा शिरूर या दुष्काळी भागाला मिळावे

## माजी आ. भीमराव धोंडे व माजी आ. बाळासाहेब आजबे यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी:- मारुती सत्रे** : महाराष्ट्रातील नदीजोड प्रकल्पाअंतर्गत समुद्रात वाहून जाणाऱ्या २०० टीएमसी पाण्यापैकी १५ ते २० टीएमसी पाणी आष्टी पाटोदा शिरूर या दुष्काळी भागाला मिळावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी आ. भीमराव धोंडे तसेच माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी शिष्टमंडळामार्फत जलसंपदा विभागाचे उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिकचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांच्याकडे निवेदनाव्दारे केली.याबाबत अधिक माहिती अशी की, माजी आमदार भीमराव धोंडे व माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्यासह शिष्टमंडळात १०० पेक्षा जास्त शेतकरी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. नाशिकचे विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा व शिरूर (कासार) तालुके मराठवाड्यातील अतिशय अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात. या भागात दरवर्षी पिण्याच्या पाण्याचे तीव्र दुर्भिक्ष निर्माण होते. परिणामी येथील नागरिकांना पिण्याच्या व शेती पाण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. तसेच रोजगाराच्या अभावामुळे अनेकांना ऊसतोड व इतर कामांसाठी स्थलांतर करावे लागते. तसेच



या भागात जानेवारी महिन्यापासूनच पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते. त्यामुळे येथील जनतेचे जीवनमान अत्यंत कठीण बनले आहे. राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी देखील समुद्रात वाहून जाणारे पाणी दुष्काळग्रस्त भागांना उपलब्ध करून देण्याचा मनोदय व्यक्त केला आहे.त्या अनुषंगाने समुद्रात वाहून जाणारे पाणी या तीन तालुक्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रात नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून मिळाल्यास दुष्काळी भागातील जवळपास २०० गावांना याचा फायदा होईल.यावेळी तालुक्यातील दुष्काळी भागाला समुद्रात वाहून जाणाऱ्या २०० टीएमसी पाण्यापैकी १५ ते २० टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन जलसंपदा विभागाचे उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिकचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांनी दिले. यावेळी पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे,जि. प. चे माजी सदस्य रामराव खेडकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, महेश कारखान्याचे व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, रिपाईंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, माजी जि. प. सदस्य सतिश झगडे,राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दिपक घुमरे, माजी सरपंच झुंबर चव्हाण, कारखान्याचे संचालक बजरंग कर्डीले, माजी शिक्षण सभापती नियामत बेग, संचालक ॲड. रत्नदिप निकाळजे, उद्धव विधाते, शहादेव गर्जे, बाबासाहेब वाघुले, प्रा. केशव शिंदे, अशोक खेडकर, अंकुश मुंढे, संतोष गोल्हार, शहादेव गर्जे तसेच राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विश्वास नागरगोजे,जि.प.चे माजी सदस्य सुरेश माळी, महादेव दानवे, चेअरमन राजाराम ननवरे, नानाभाऊ वाडेकर, विठ्ठल लांडगे, बाबुराव जाधव, माजी सभापती अनिल जायभाय, बाळासाहेब शेकडे, संदीप नागरगोजे, सागर वनवे, शाम हुले, तात्यासाहेब लाड,सचिन जायभाय, माजी सरपंच भागवत वारे, डॉ. प्रभाकर कवठेकर, दिगंबर ठोंबरे, सुभाष ठोंबरे, सुरेश शेकडे,कचरू काळे, दादासाहेब सव्वाशे,उद्धव शिरसाठ, सावळेराम जायभाय, अभिलाश गाडेकर , वैभव बडे, महारूद्र खेडकर व इतर अनेक कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

# महाराणा प्रतापसिंह जयंती साजरी

## माहूरच्या तहसील कार्यालयासह विविध ठिकाणी जयंती साजरी



**दैनिक युवक आधार**


**श्रीक्षेत्र माहूर प्रतिनिधी/ सय्यद इसा** : माहूर शहरातील तहसील कार्यालयात तहसीलदार अभिजीत जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराणा प्रताप सिंह जयंती साजरी करत नमन करण्यात आले तहसील कार्यालयात महाराणा प्रताप सिंह जयंतीच्या निमित्ताने तहसीलदार अभिजीत जगताप नायब तहसीलदार कैलास जेठे नायब तहसीलदार अरुणा सूर्यवंशी नायब तहसीलदार कैलास श्रोते यांचे सह मान्यवरांनी महाराणा प्रताप सिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करून नमन करत जयंती साजरी केली

यावेळी अ का संजय गोडबोले अ का प्रभू पानोडे लिपिक वैभव घोडे वैभव पांढरे तलाठी शेषराव गावंडे रेणुकादास आठवले प्रकाश शेडमाके यादव तोडसाम धम्मपाल पाईकराव विलास शेडमाके यांचे सह कर्मचारी उपस्थित होते.

# चंडिकापूर येथील मंदिरात भरदिवसा चोरी; देवीचा चांदीचा मुकुट लंपास, चोरटा सीसीटीव्हीत कैद

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/ प्रतिनिधी** : जिल्ह्यातील चंडिकापूर ता.आकोट येथे एक धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. येथील प्रसिद्ध श्री चंडिका माता मंदिरात भरदुपारी एका अज्ञात चोरट्याने प्रवेश करून चंडिका मातेच्या मूर्तीवरील चांदीचा मुकुट चोरून नेला. ही संपूर्ण घटना मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, काल दुपारी ३ वाजेच्या सुमारास जेव्हा मंदिरात भाविकांची वर्दळ कमी होती, याचाच फायदा अज्ञात युवकाने घेतला. त्याने मंदिरात प्रवेश केला आणि गाभाऱ्यात जाऊन चंडिका मातेच्या मूर्तीवर असलेला चांदीचा मुकुट शिताफीने चोरून नेला.

मंदिराच्या प्रशासनाला चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तात्काळ सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये:

एक अज्ञात युवक मंदिरात संशयास्पद रित्या फिरताना दिसत आहे.योग्य संधी साधून त्याने मूर्तीचा मुकुट चोरल्याचे कॅमेऱ्यात स्पष्ट झाले आहे. भरदिवसा गाभाऱ्यात शिरून थेट देवीचाच मुकुट चोरल्यामुळे चंडिकापूर येथील भाविक आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे.

या घटनेची माहिती स्थानिक पोलिसांना देण्यात आली आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून मंदिरातील सीसीटीव्ही फुटेज आपल्या ताब्यात घेतले आहे. फुटेजच्या आधारे अज्ञात चोरट्याचा शोध सुरू असून, त्याला लवकरच बेड्या ठोकल्या जातील, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. या चोरीमुळे मंदिरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# आईच्या शेताकडे जाण्यासाठी रस्ता मागितल्याने वाद; भावासह चौघांवर गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : आईच्या शेताकडे जाण्यासाठी रस्ता मागितल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एकास बेदम मारहाण केल्याची घटना केऱ्हाळा (गट क्र. ३४) शिवारात २७ मे रोजी सकाळी १०:३० वाजता घडली. याप्रकरणी सर्जेराव गणपत शेंडे (वय ३२, रा. केऱ्हाळा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात भावासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नेमकी घटना अशी:**

दोन महिन्यांपूर्वी सर्जेराव शेंडे यांच्या आईने आपल्या चारही मुलांमध्ये जमिनीचे वाटप केले. प्रत्येकी १९ गुंठे जमीन मुलांना देऊन ३० गुंठे जमीन आईने स्वतःच्या नावावर राखून ठेवली होती. २७ मे रोजी सकाळी शेतात जमिनीचे वाटप व मोजणी सुरू असताना, आईच्या शेताकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याचे सर्जेराव यांच्या लक्षात आले. त्यांनी आपला भाऊ आवचित शेंडे याला, "आईच्या शेतात जाण्यासाठी रस्ता देणे आवश्यक आहे," असे सुचविले.

यावरून आवचित शेंडे याने रस्ता देण्यास विरोध करत "आई वाटेल त्या शेतातून जाईल, रस्ता देण्याची गरज नाही," अशी भूमिका घेतली. या वादातून आवचित गणपत शेंडे, सुमित पांढरे, विकास बिरारे आणि किशोर वाघ (सर्व रा. केऱ्हाळा) यांनी संगनमत करून सर्जेराव यांना शिवीगाळ केली. त्यानंतर दगड फेकून मारत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली, असे फिर्यादीत म्हटले आहे.

सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक रवींद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार पवार पुढील तपास करत आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# वाशिम-रिसोड हायवेवर चक्काजाम; बालाजी पाटील मोरे यांच्या नेतृत्वाखाली एल्गार !

## जांभरुणच्या भीषण पाणीटंचाईविरोधात संतप्त ग्रामस्थांचा रास्ता रोको आंदोलन; प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम तालुक्यातील जांभरुण परिसरामध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याने संतप्त ग्रामस्थांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सोनू ताई मुळे यांच्या नेतृत्वात व क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वाशिम-रिसोड हायवेवर रास्ता रोको चक्काजाम आंदोलन करत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

गेल्या अनेक महिन्यांपासून गावामध्ये नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. महिलांना व नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक किलोमीटर पायपीट करावी लागत असून प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

आज सकाळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला, युवक व क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते वाशिम-रिसोड हायवेवर एकत्र आले. यावेळी "पाणी द्या अन्यथा खुर्ची खाली करा", "झोपलेल्या प्रशासनाला जागे करा", "जलजीवन मिशनचा हिशोब द्या" अशा घोषणा देत संतप्त आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाचा निषेध केला.



क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील मोरे यांनी यावेळी प्रशासनावर जोरदार टीका करत सांगितले की, शासनाच्या विविध पाणीपुरवठा योजनांवर कोट्यवधी रुपयांचा खर्च होत असताना ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. जांभरुण गावातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा, तातडीने टँकर व्यवस्था व कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली.

**"जांभरुणसह ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागत असेल तर हे प्रशासनाचे मोठे अपयश आहे. तात्काळ पाणीपुरवठा सुरू करून कायमस्वरूपी उपाययोजना केल्या नाहीत तर जिल्हाधिकारी कार्यालयावर घागर मोर्चा काढून यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्यात येईल."**

**— बालाजी पाटील मोरे**
**जिल्हाध्यक्ष, क्रांतिकारी शेतकरी संघटना**

रास्ता रोको आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती. दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आंदोलनाची माहिती मिळताच पोलीस प्रशासन, महसूल विभागाचे अधिकारी व संबंधित विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले.

लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असून मागण्या पूर्ण न झाल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त ग्रामस्थ व क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, तात्काळ पाणीपुरवठा सुरू करण्यात आला नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयावर घागर मोर्चा काढण्यात येईल.

या आंदोलनात सोनू प्रवीण मुळे, सतीश इडोळे, बालाजी मोरे, नामदेव पतंगे, प्रवीण मते, मनोहर सावके, अभिषेक मोहळे, अरुण खडसे, महादेव जाधव, सुनील कटारे यांच्यासह गावातील मोठ्या संख्येने महिला व नागरिक सहभागी झाले होते.

घटनेची गंभीरता लक्षात घेता पोलिस प्रशासनाकडून मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता.

---

# पेट्रोल–डिझेल दरवाढ तात्काळ मागे घ्या ; अन्यथा जिल्हाभर आंदोलन छेडणार – सिंधुदुर्ग जिल्हा काँग्रेस

**दैनिक युवक आधार**

**मुंबई - किशोर गुडेकर, जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या वाढत्या किंमतींमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवन असह्य झाले असून केंद्र सरकारने तात्काळ इंधन दरवाढ मागे घ्यावी, अन्यथा आठवडाभरात सिंधुदुर्ग जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सिंधुदुर्ग जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अरविंद मोंडकर यांनी दिला आहे.

जिल्हा काँग्रेसच्या वतीने सादर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मागील ११ दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये प्रतिलिटर ८ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. आधीच महागाईने त्रस्त असलेल्या जनतेसाठी ही दरवाढ जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. गेल्या १२ वर्षांत पेट्रोलच्या किमतींमध्ये ३८ टक्के तर डिझेलच्या किमतींमध्ये ६२ टक्क्यांची वाढ झाली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारच्या काळात कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल १०० डॉलर्सपर्यंत पोहोचले होते. तरीदेखील पेट्रोल व डिझेलचे दर ७२ रुपयांच्या पुढे जाऊ दिले नव्हते. मात्र मागील काही वर्षांत कच्च्या तेलाचा भाव ५० ते ५५ डॉलर्स प्रति बॅरलच्या आसपास असतानाही पेट्रोलचे दर शंभर रुपयांच्या आसपास कायम ठेवण्यात आले होते.

केंद्र सरकारने गेल्या १२ वर्षांत पेट्रोलियम उत्पादनांवरील कर आणि उत्पादन शुल्काच्या माध्यमातून तब्बल ४३ लाख कोटी रुपयांचा महसूल मिळविला असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. तसेच अलीकडील चार रुपयांच्या दरवाढीतून भारत पेट्रोलियम, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन या कंपन्यांनी काही तासांतच सुमारे १२,४०० कोटी रुपयांची कमाई केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.










पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडरच्या किंमती वाढल्याने त्याचा परिणाम केवळ इंधनापुरता मर्यादित राहत नाही, तर वाहतूक, शेती, उद्योग तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतींवरही होतो. उत्पन्नात वाढ होत नसताना महागाई मात्र सातत्याने वाढत असल्याने सर्वसामान्य जनतेचे आर्थिक गणित कोलमडले आहे. त्यामुळे सरकारने जनतेला दिलासा देण्यासाठी इंधन दरवाढ तात्काळ मागे घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

राज्यातील अनेक पेट्रोल पंपांवर इंधनाचा पुरवठा विस्कळीत झाल्याने शेतकऱ्यांनाही फटका बसत आहे. शेतीची कामे करण्यासाठी ट्रॅक्टर व इतर यंत्रसामग्रीसाठी डिझेल आवश्यक असून डिझेलअभावी अनेक ठिकाणी शेतीची कामे खोळंबली आहेत. शेतीची कामे वेळेत न झाल्यास अन्नधान्य उत्पादनावर परिणाम होऊन महागाई आणखी वाढण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा संवेदनशीलतेने विचार करून पेट्रोल-डिझेलची दरवाढ तात्काळ मागे घ्यावी तसेच राज्यात इंधनाचा पुरवठा कोणतीही अडचण न येता सुरळीत ठेवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा न्यायासाठी सिंधुदुर्ग जिल्हाभर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही काँग्रेसने दिला आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष अरविंद मोंडकर, प्रदेश सरचिटणीस साईनाथ चव्हाण, माजी जिल्हाध्यक्ष इर्शाद शेख, विलास गावडे, महिला जिल्हाध्यक्षा साक्षी वंजारी, युवक जिल्हाध्यक्ष किरण टेबूलकर, सेवादल समन्वयक अजिंक्य गावडे, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश जैतापकर, मेघनाद धुरी, जिल्हा सरचिटणीस रवींद्र उर्फ बाब्या म्हापसेकर, बाळू मेस्त्री, प्रवीण वरुणकर, वि. के. सावंत, विद्या प्रसाद बांदेकर, महेश तेली, शांताराम नेवरेकर, तालुकाध्यक्ष विधाता सावंत, जेम्स फर्नांडीस, प्रदीप मांजरेकर, उमेश कुलकर्णी, अभय मालवणकर, मंदार शिरसाट, बाळा धाऊसकर, संजय लाड, सुरज घाडी, प्रवीण आचरेकर, तबरेज शेख, चंदन पांगे, उल्हास शिरसाट, यश तेली, बाळा शिरोडकर, प्रमोद घाडीगावकर, लक्ष्मण शिरोडकर, सोशल मीडिया जिल्हा समन्वयक केतन गावडे, उमेश मोंडकर, शेलटकर, आनंद परुळेकर, अतिश उर्फ भाई जेठे तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


---

# पाटोद्यात आरोग्य व्यवस्थेचे तीन तेरा ; सर्पदंशग्रस्ताचा मृत्यू

## रुग्णवाहिका व योग्य उपचार वेळेत न मिळाल्याने जावळे यांचा दुर्दैवी अंत

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : पाटोदा तालुक्यातील जवळाला येथील मधुकर जावळे यांचा सर्पदंशामुळे दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली असून, या घटनेमुळे तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सर्पदंश झाल्यानंतर जावळे यांना तातडीने उपचाराची आवश्यकता होती. मात्र रुग्णवाहिका वेळेत उपलब्ध न झाल्याने आणि योग्य उपचार मिळण्यास विलंब झाल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार मधुकर जावळे यांना सर्पदंश झाल्यानंतर कुटुंबीयांनी तातडीने १०८ रुग्णवाहिकेशी संपर्क साधला. मात्र बराच वेळ रुग्णवाहिका



उपलब्ध झाली नाही. त्या नंतर खासगी वाहनातून त्यांना पाटोदा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र ग्रामीण रुग्णालयातही योग्य उपचार न झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. प्रकृती गंभीर होत असल्याने डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारासाठी बीड येथे रेफर केले. मात्र बीडकडे नेत असताना रस्त्यातच मधुकर जावळे यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे जवळाला गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत असून नागरिकांनी आरोग्य विभागाच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. ग्रामीण भागात आपत्कालीन परिस्थितीतही रुग्णवाहिका वेळेत मिळत नसल्याने आणि प्राथमिक उपचार व्यवस्था सक्षम नसल्याने सर्वसामान्य नागरिकांचे जीव धोक्यात येत असल्याची भावना व्यक्त होत आहे. सर्पदंशासारख्या गंभीर घटनांमध्ये तातडीची उपचार व्यवस्था उपलब्ध असणे आवश्यक असताना झालेल्या या प्रकारामुळे आरोग्य यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. तसेच ग्रामीण रुग्णालयातील सुविधा तातडीने सुधाराव्यात व पाटोद्याला उपजिल्हा रुग्णालय मंजूर करावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

---

# OBC समाजाच्या अस्तित्वासाठी गोरेगावात भव्य बाईक रॅली व आंदोलन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी** : OBC समाजासाठी जनगणनेमध्ये स्वतंत्र कॉलमचा समावेश करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघाच्या वतीने गुरुवार दिनांक 28 मे 2026 रोजी गोरेगाव येथे भव्य बाईक रॅली व निवेदन आंदोलन उत्साहात पार पडले.

माजी खासदार डॉ. खुशाल बोपचे यांच्या नेतृत्वामध्ये आयोजित करण्यात आलेल्या



या आंदोलनात मोठ्या संख्येने OBC बांधव, युवक, महिला, विद्यार्थी, शेतकरी व सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. सकाळी ठाणा रोड येथून सुरू झालेली बाईक रॅली ठाणा चौक मार्गे तहसील कार्यालय, गोरेगाव येथे पोहोचली.रॅलीदरम्यान "OBC जनगणना झालीच पाहिजे", "OBC ना स्वतंत्र कॉलम मिळालाच पाहिजे" अशा जोरदार घोषणांनी संपूर्ण गोरेगाव शहर दणाणून गेले. सहभागी आंदोलकांनी तहसील कार्यालयात जाऊन शासनाच्या नावाने निवेदन सादर केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी OBC समाजाच्या अस्तित्व, हक्क, आरक्षण व भावी पिढ्यांच्या न्यायासाठी स्वतंत्र जनगणना कॉलम अत्यंत आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. शासनाने OBC समाजाच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. आंदोलन शांततापूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडले असून मोठ्या संख्येतील सहभागामुळे OBC समाजाची एकजूट पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

---

# महाशिवरात्रीला "द्राक्ष दिन" साजरा करण्याच्या उपक्रमाला भारत सरकारकडून पेटंट मान्यता

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी** : द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि द्राक्ष सेवनाला धार्मिक व सांस्कृतिक परंपरेची जोड देण्याच्या उद्देशाने तासगांव येथील यश द्राक्ष नगरी फार्मर प्रोडूसर कंपनी तर्फे गेल्या चार वर्षांपासून महाशिवरात्रीच्या दिवशी "द्राक्ष दिन" साजरा करण्यात येत आहे. या अभिनव उपक्रमाला आता भारत सरकारकडून पेटंट मान्यता प्राप्त झाली असून, द्राक्ष उत्पादकांसाठी ही अभिमानाची बाब मानली जात आहे.या मान्यतेमुळे महाशिवरात्रीच्या दिवशी "द्राक्ष दिन" साजरा करण्याच्या उपक्रमाला अधिकृत स्वरूप प्राप्त झाले आहे. भविष्यात हा उपक्रम अधिक व्यापक पातळीवर राबविण्याचा निर्धार संस्थेने व्यक्त केला









आहे.भगवान शंकराला रुद्राक्ष प्रिय मानले जाते. रुद्राक्षातील "रु" काढले तर "द्राक्ष" हा शब्द तयार होतो, या भावनिक संकल्पनेतून महाशिवरात्रीच्या दिवशी भगवान शंकराला द्राक्ष अर्पण करणे, पिंडीवर वाहणे आणि प्रसाद म्हणून द्राक्ष सेवन करण्याचा संदेश दिला जात आहे. श्रद्धेनुसार असे केल्यास मनोकामना पूर्ण होतात, असा विश्वास अनेक भक्त व्यक्त करत आहेत.महाशिवरात्रीच्या काळात द्राक्षांचा हंगामही जोमात असतो.

**"योग दिन, महिला दिन, कामगार दिन यांसारखे विशेष दिवस ज्या उत्साहात देशभरात साजरे केले जातात, त्याच पद्धतीने 'द्राक्ष दिन'ही साजरा व्हावा. महाशिवरात्रीच्या दिवशी भगवान शंकराला द्राक्ष अर्पण करून, प्रसाद म्हणून द्राक्ष सेवन करत या उपक्रमाचा प्रचार केल्यास द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीस मोठी मदत होऊ शकते."***

**विजय कुंभार**
**संचालक, यश द्राक्षनगरी फार्मर प्रोडूसर कंपनी**

बाजारात मोठ्या प्रमाणावर द्राक्ष उपलब्ध असतात. त्यामुळे या दिवशी देशभरात द्राक्ष सेवन आणि द्राक्ष अर्पणाची परंपरा वाढल्यास द्राक्ष विक्रीला मोठी चालना मिळू शकते. त्याचा थेट फायदा द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना होणार असून, द्राक्षांना चांगला दर मिळण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.देशभरात भगवान शंकराची असंख्य मंदिरे आहेत. प्रत्येक मंदिरात नैवेद्य म्हणून द्राक्ष अर्पण करण्यात आली आणि नागरिकांनी प्रसाद म्हणून द्राक्ष सेवन केले, तर एका दिवसात मोठ्या प्रमाणात द्राक्षांची मागणी निर्माण होऊ शकते. त्यामुळे द्राक्ष शेतीच्या विस्ताराला आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीला चालना मिळेल, असेही संस्थेचे म्हणणे आहे.सध्या देशात अंदाजे ३२ लाख टन द्राक्ष उत्पादन घेतले जाते. मात्र, प्रत्येक व्यक्तीने अल्प प्रमाणात द्राक्ष सेवन केले तरी देशात मोठ्या प्रमाणावर मागणी निर्माण होऊ शकते. त्यामुळे द्राक्ष उत्पादकांना बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होईल. यश द्राक्ष नगरी फार्मर प्रोडूसर कंपनी गेल्या चार वर्षांपासून या उपक्रमाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम करत आहे. सुरुवातीला दोन गावांत सुरू झालेला हा उपक्रम आता महाराष्ट्रातील सुमारे सात हजारांहून अधिक गावांत उत्साहात साजरा केला जात असल्याचा दावा संस्थेकडून करण्यात आला आहे.या उपक्रमांतर्गत भगवान शंकराला द्राक्ष अर्पण करणे, विविध मान्यवर व लोकप्रतिनिधींना "द्राक्ष तुला" करणे, तसेच द्राक्ष सेवनाचे धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व पटवून देण्यासाठी जनजागृती केली जात आहे.

---

# अ . भा . संयुक्त अधिवक्ता मंच भारताचा स्थापना दिन उद्या ; नागपुरात भव्य कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**वाडी प्रतिनिधी राकेश यादव** : "अ‍ॅडव्होकेट प्रोटेक्शन अ‍ॅक्ट" संपूर्ण देशभर लागू करण्यात यावा, या मागणीसाठी गेल्या पाच वर्षांपासून अखिल भारतीय संयुक्त अधिवक्ता मंच भारत देशव्यापी सामूहिक लढा देत आहे. मंचाचा स्थापना दिन दरवर्षी ३१ मे रोजी देशभरात साजरा केला जातो. त्यानिमित्ताने मंचाशी संलग्न विदर्भातील सदस्य व पदाधिकारी यंदाचा पाचवा स्थापना दिन ३१ मे रोजी नागपूर येथील रविभवनच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये साजरा करणार आहेत.

या कार्यक्रमात विदर्भ, महाराष्ट्रासह विविध जिल्ह्यांतील मोठ्या संख्येने अधिवक्ता सहभागी होणार असल्याची माहिती नागपूर जिल्हाध्यक्ष तसेच मध्यप्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा आणि दिल्लीचे सहप्रभारी अधिवक्ता छत्रपती शर्मा यांनी पत्रकाद्वारे दिली.

अधिवक्ता शर्मा यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे की, हे एक गैरराजकीय व्यासपीठ असून मंचाचा मुख्य उद्देश अधिवक्त्यांचे हित, कल्याण, सन्मान आणि सुरक्षेसाठी संघर्ष करणे हा आहे. तसेच सर्व अधिवक्ते व त्यांच्या कुटुंबियांचे भविष्य सुरक्षित करणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीचे संरक्षण करणे, हा मंचाचा प्रमुख हेतू आहे.

# कोकण विधान परिषदेत महायुतीत रस्सीखेच; शेकापच्या एन्ट्रीने राजकारणाला नवा ट्विस्ट

## "दाढीवाल्या बाबाची अदृश्य शक्ती" म्हणत अरविंद म्हात्रेंचा मिश्किल टोला; रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात रंगणार तिरंगी सामना?

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत यंदा महायुतीतच मोठी रस्सीखेच पाहायला मिळत असून, शिंदे गटाची शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील अंतर्गत संघर्ष आता उघडपणे समोर येऊ लागला आहे. एकीकडे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे आपल्या पुत्रासाठी जोरदार फिल्डिंग लावत असल्याची चर्चा रंगली आहे, तर दुसरीकडे राज्याचे मंत्री भरत गोगावले देखील आपल्या मुलासाठी आग्रही असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे कोकणातील ही जागा महायुतीसाठी प्रतिष्ठेची ठरत असतानाच, शेतकरी कामगार पक्षाने (शेकाप) अचानक मैदानात उडी घेत संपूर्ण राजकीय समीकरणच बदलून टाकले आहे.

शेकापने माजी रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्ष आणि पनवेल महापालिकेतील विद्यमान विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांना अधिकृत उमेदवारी जाहीर करत कोकणच्या राजकारणात मोठा ट्विस्ट निर्माण केला आहे. अलिबाग येथील शेतकरी भवनात पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि माजी शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांच्या उपस्थितीत म्हात्रे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. सोमवारी (ता. १) रत्नागिरी येथे ते उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, महायुतीत सुरू असलेल्या अंतर्गत संघर्षामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादीने 'सीक्रेट गेम' खेळत



भरत गोगावले यांना शांत केल्याची चर्चा सध्या कोकणच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्रीपद गोगावले यांच्या पदरात टाकून विधान परिषदेची जागा राष्ट्रवादीने आपल्याकडे ठेवून घेतल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे माजी आमदार अनिकेत तटकरे यांचा उमेदवारीचा मार्ग मोकळा झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. मात्र, भरत गोगावले यांनी अशी कोणतीही डील झालेली नसल्याचे स्पष्ट करत राजकीय बॉम्ब टाकला आहे. त्यामुळे रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग या जागेवरून महायुतीतील पेच अद्याप कायम असल्याचे चित्र आहे.याच गोंधळात शेकापने थेट उमेदवार जाहीर करत महायुतीचे टेन्शन वाढवले आहे. विशेष म्हणजे, या मतदारसंघासाठी शेकापने पहिल्यांदाच अधिकृत उमेदवार दिला आहे. त्यामुळे ही केवळ निवडणूक नसून शेकापच्या भविष्यातील राजकीय अस्तित्वाची लढाई मानली जात आहे. कोकणातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपली ताकद अजूनही कायम असल्याचा संदेश देण्याचा हा प्रयत्न असल्याचेही बोलले जात आहे.कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांतील तब्बल १०२१ मतदार निर्णायक भूमिका बजावणार आहेत. महापालिका, नगरपालिका, नगर परिषद, जिल्हा परिषद सदस्य तसेच पंचायत समिती सभापती या निवडणुकीत मतदान करतात. फक्त रायगड जिल्ह्याचा विचार केल्यास येथे ५१८ मतदार आहेत. त्यापैकी शेकापकडे अवघे ४३ सदस्य असल्याचे सांगितले जात असले तरी ठाकरे गटाची शिवसेना आणि काँग्रेसकडून शेकापला पडद्यामागून मदत मिळू शकते, अशी जोरदार चर्चा आहे. त्यामुळे ही निवडणूक केवळ आकड्यांची नाही तर 'क्रॉस वोटिंग' आणि 'राजकीय गेम प्लॅन'ची ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

अरविंद म्हात्रे हे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील दांडगा संपर्क, शांत पण आक्रमक राजकीय शैली आणि संघटन कौशल्यासाठी ओळखले जातात. रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले असून सध्या पनवेल महापालिकेतील विरोधी पक्षनेते म्हणूनही ते सक्रिय आहेत. त्यामुळेच शेकापने त्यांच्यावर विश्वास टाकल्याचे मानले जात आहे. दरम्यान, उमेदवारी जाहीर होताच अरविंद म्हात्रे यांनी केलेल्या एका विधानाने संपूर्ण राजकीय वर्तुळात चर्चांचा धुरळाच उडवून दिला आहे. "माझ्या मागे दाढीवाल्या बाबाची अदृश्य शक्ती आहे," असे मिश्किल विधान त्यांनी केले. त्यांच्या या वक्तव्यानंतर आता जिल्ह्यासह संपूर्ण कोकणच्या राजकारणात "तो दाढीवाला बाबा नेमका कोण?" याचीच चर्चा रंगली आहे. काही जण हे विधान राजकीय सूचक इशारा मानत आहेत, तर काहींनी त्यात गूढ राजकीय संदेश शोधण्यास सुरुवात केली आहे.एकंदरित पाहता, कोकण विधान परिषद निवडणुकीत यंदा महायुतीतील अंतर्गत वाद, राष्ट्रवादी-शिवसेना संघर्ष, शेकापची धडाकेबाज एन्ट्री आणि पडद्यामागील राजकीय समीकरणे यामुळे ही निवडणूक चांगलीच रंगतदार होण्याची चिन्हे आहेत. आता या राजकीय पटावर अंतिम चाल कोणाची भारी पडणार, याकडे संपूर्ण कोकणचे लक्ष लागले आहे.

# नदीजोड प्रकल्पासाठी रखरखत्या उन्हात शेतकऱ्यांचा बैलगाडी मोर्चा

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी :** मराठवाड्यातील शेती पाणी नसल्यामुळे पिकत नसल्याने - मराठवाड्याच्या हक्काचे पाणी देण्यात यावे या मागणीसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयवार बैलगाडी मोर्चा काढण्यात आला होता. रखरखत्या उन्हामध्ये हा मोर्चा कलेक्टर कचेरीवर धडकला होता. मोर्चामध्ये शेकडो शेतकऱ्यांचा सहभाग होता. पाणी आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं ,यासह इतर घोषणांनी नगररोड परिसर दणाणून गेला होता.

कोकणातील १६८ टीएमसी पाणी नदीजोड प्रकल्पातून नियोजीत वेळेत जायकवाडी धरणात आणून बीड जिल्ह्यातील शेतीला देण्यात यावे, गोदावरी, सिंदफणा नदीजोड प्रकल्प व उपकालव्याचा सर्व्हे तातडीने करावा, कोकणातून येणाऱ्या १६८ टीएमसी पाण्यात बीड जिल्ह्याच्या वाट्याला किती पाणी येणार? प्रोजेक्ट रिपोर्ट तात्काळ करावा, गेवराई तालुक्यातील उजवा कालवा व माजलगाव धरणाला जायकवाडीतून मिळणारे पाणी कमी

केले आहे ते पूर्ववत करावे, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना गतवर्षीचा पीकविमा तातडीने द्यावा यासह इतर मागण्यांसाठी आज सिद्धीविनायक कॉम्प्लेक्सपासून बैलगाडी मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चामध्ये शेकडो शेतकऱ्यांचा सहभाग होता. शेतकऱ्यांचा लोकलढा ,जायकवाडीचे




पाणी सोडा ,पाणी आमच्या हाकाचं, नाही कोणाच्या बापाचं यासह इतर घोषणांनी सदरील परिसर दणाणून गेला होता. सदरील मोर्चा लोकलढा आंदोलकांच्या आयोजकांनी काढला होता.मोर्चानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. यामध्ये जायकवाडी धरणातून तातडीने सिंदफणा नदीपात्रात पाणी सोडावे, बीड जिल्ह्याच्या हक्काच्या पाण्याबाबत ठोस निर्णय घ्यावा आणि नदीजोड प्रकल्पाचे काम गतीने पूर्ण करावे, अशा मागण्या करण्यात आल्या.

# काँग्रेस पनवेल जिल्हाध्यक्षपदी श्रुती म्हात्रे निवडीला हेमराज म्हात्रे सह शेकडो कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांचा विरोध

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/मुंबई:** पक्षाचे नेते राहुलजी गांधी यांनी "संघटन सृजन" माध्यमातून तळागाळातील प्रामाणिक, निष्ठावान व संघर्षशील कार्यकर्त्यांना संघटनेत मुख्य जबाबदारी देण्याचे जे स्वप्न मांडले होते, त्या प्रक्रियेला हरताळ फासून झालेल्या नवनियुक्त जिल्हाध्यक्षा श्रुती म्हात्रे यांचा पनवेल येथील काँग्रेस भवन येथे वादग्रस्त पदग्रहण समारंभ सुरू असतानाच, या निवडीला जाहीर आणि तीव्र विरोध करत पनवेल काँग्रेसमधील असंख्य कार्यकर्ते पनवेल काँग्रेसचे नगरसेवक, प्रमुख सेलचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि शेकडो सक्रिय कार्यकर्त्यांनी थेट मुंबई गाठत काँग्रेसचे प्रदेश मुख्यालय 'टिळक भवन' येथे धडक दिली. प्रदेशाध्यक्ष आणि वरिष्ठ नेत्यांची भेट घेऊन या निवडीबाबत तीव्र आक्षेप नोंदवण्यासाठी हे सर्व कार्यकर्ते मुंबईत दाखल झाले



आहेत.

कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार पनवेल शहर जिल्हाध्यक्ष पदी श्री. सुदाम पाटील आणि श्री हेमराज म्हात्रे यांचे नाव सुचविले असताना प्रदेश नेतृत्व व नियुक्त निरीक्षकांकडून संघटन सृजन प्रक्रिया पारदर्शक व योग्य पद्धतीने न राबविता पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष पदी चुकीची नियुक्ती करण्यात आल्याचे निदर्शनास आले, यामुळे अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी व असंतोष निर्माण झाला आहे. पक्षासाठी अनेक वर्षे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या गेल्या असून, तळागाळातील कार्यकर्त्यांच्या विश्वासाला धक्का पोहोचला आहे.


एकीकडे पदग्रहण सोहळ्याकडे पाठ फिरवून, दुसरीकडे तीव्र नाराजी काही दिवसांपूर्वीच वरिष्ठ पातळीवरून श्रुती म्हात्रे यांची पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली होती. आज पनवेलमधील काँग्रेस भवन येथे मोजक्या समर्थकांच्या उपस्थितीत त्यांचा पदभार स्वीकारण्याचा सोहळा नियोजित करण्यात आला होता. मात्र, हा सोहळा सुरू असतानाच पनवेल काँग्रेसमधील स्थानिक पातळीवर वर्षानुवर्षे पक्षाचे काम करणाऱ्या निष्ठावंतांना, नगरसेवक आणि सक्रिय पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता ही एकतर्फी नियुक्ती करण्यात आल्याचा आरोप नाराज असंख्य कार्यकर्त्यांनी केला आहे.

**शेकडो कार्यकर्त्यांचा मुंबईत ठिय्या**

पनवेलमध्ये पदग्रहण सोहळा सुरू असतानाच, दुसरीकडे पनवेलमधून उत्साही कार्यकर्त्यांची वाहने मुंबईच्या दिशेने रवाना झाली. टिळक भवन येथे पोहोचलेल्या या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडे आपली नाराजी व्यक्त केली. "आम्ही अनेक वर्षांपासून पक्षाचे काम करत आहोत. स्थानिक समीकरणे आणि कार्यकर्त्यांची मानसिकता न समजता जर निर्णय लादले गेले, तर आगामी काळात पक्षाला याचे मोठे नुकसान सोसावे लागेल," अशी भावना नाराज नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी प्रदेशाध्यक्ष मा. श्री हर्षवर्धन सपकाळ यांच्या समोर व्यक्त केली आहे.

यावेळी प्रदेशाध्यक्षांनी हे प्रकरण दिल्ली मध्ये वरिष्ठ नेतृत्वाच्या निदर्शनास आणून येत्या १५ दिवसात निकाली काढण्याचे आश्वासन पनवेलच्या सर्व कार्यकर्त्यांना दिले आहे.

# युअर ऑनर... स्वच्छता हवीच!'



■ न्यायालयीन निरीक्षणाच्या अनुषंगाने 'कॉकरोच जनता पार्टीच्या प्रतीकात्मक आंदोलनाचा उदय

■ निसर्गातील 'स्वच्छता दूत' असलेल्या झुरळांचे वैज्ञानिक वास्तव समोर!

**निसर्गातील 'स्वच्छता दूत'**

**निसर्गाच्या अन्नसाखळीत झुरळांची भूमिका 'स्कॅव्हेंजर' म्हणून अत्यंत महत्त्वाची आहे. झाडांचा पालापाचोळा व सेंद्रिय कुजके घटक खाऊन ते पर्यावरणाची स्वच्छता राखतात. 'आर्जेंटाइन वूड रोच' ही जात प्लास्टिकचेही नैसर्गिक विघटन करण्यास सक्षम आहे.**

**घरात झुरळ तेव्हाच आढळतात जेव्हा तिथे अस्वच्छता अथवा दमटपणा असतो. कोणत्याही स्वरूपातील अस्वच्छता जन्मास येऊ नये म्हणून सर्व स्तरावर कमालीची स्वच्छता राखली पाहिजे, मग ते घर असो की देश!"**

**- डॉ. संतोष पाटील, पर्यावरण अभ्यासक, सिल्लोड**

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : "युअर ऑनर... स्वच्छता हवीच!" हे केवळ एका न्यायालयीन सुनावणीतील निरीक्षण नसून, सद्यस्थितीत तो तरुणाईचा एक प्रबळ 'सूर' बनला आहे. सर्वोच्च न्यायालयातील एका सुनावणीदरम्यान न्यायमूर्तींनी केलेल्या निरीक्षणाचा धागा पकडत, सोशल मीडियावर तरुणाईने 'कॉकरोच जनता पार्टी'च्या माध्यमातून एक उपरोधिक आणि प्रतीकात्मक अभिव्यक्ती व्यक्त केली आहे. छत्रपती संभाजीनगरमधील एका युवकाने या संदर्भाला दिलेले प्रतीकात्मक वळण सध्या डिजिटल विश्वात चर्चेचा केंद्रबिंदू ठरले आहे. या विषयाच्या निमित्ताने 'झुरळ' हा सूक्ष्म कीटक केवळ चर्चेतचं आला नाही, तर त्याच्या २५ कोटी वर्षांच्या अस्तित्वाचा रंजक वैज्ञानिक प्रवासही प्रकाशझोतात आला आहे.

• *कीटकशास्त्रात क्रांती: आधुनिक 'डीएनए' बारकोड लायब्ररी•

झुरळांच्या जैवविविधतेचा सखोल अभ्यास करून पुण्याच्या संशोधकांनी एक आधुनिक "डीएनए बारकोड लायब्ररी" स्थापित केली आहे. कीटकशास्त्राच्या इतिहासात हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो. जगभरात झुरळांच्या सुमारे ४,५०० जाती असून, त्यापैकी १९१ जाती भारतात आढळतात. यातील बहुतांश जाती मानवी वस्तीत न राहता नैसर्गिक अधिवासात आढळतात.

• झुरळांची रंजक तथ्ये आणि जीवनशैली•

झुरळ हा सर्वाहारी जीव असून, अन्न न मिळताही ते महिनाभर जगू शकतात. हवेविना ते 40 मिनिट जगतात.. मृत झुरळ व झुरळाने कात टाकलेली त्वचा हे 'केराटिन' प्रथिनांसाठी गांधील माश्यांचे प्रमुख अन्न असल्याचे निदर्शनास आले आहे. विशेष म्हणजे, दक्षिण भारतातील जंगलात आढळणारे 'इंडियन डॉमिनो रोच' हे झुरळ दिसायला अत्यंत सुंदर आणि आकर्षक असते.

• भीतीचे रुपांतर स्वच्छतेत: 'काटारिडाफोबिया'•

झुरळांची भीती वाटणे ही एक सामान्य प्रतिक्रिया असून, विज्ञानात याला 'काटारिडाफोबिया' असे संबोधले जाते. मानसशास्त्रज्ञांच्या मते, बालपणापासून मनात असलेली ही भीती अनेकदा घरात 'सतत स्वच्छता राखण्याच्या' सकारात्मक सवयीत रूपांतरित होते, ज्यामुळे कुटुंबाचे आरोग्य अबाधित राहण्यास मदत होते. ही एक प्रकारची 'आरोग्यदायी शिस्त' असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

• २५ कोटी वर्षांचा इतिहास; अनुकूलन क्षमतेचा चमत्कार•

झुरळ हा जीव तब्बल २५ कोटी वर्षांपासून म्हणजेच 'मेसोझोइक' कालखंडापासून पृथ्वीवर अस्तित्व टिकवून आहे. महाकाय डायनासोर नष्ट होऊनही, कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत स्वतःला अनुकूल करून घेण्याच्या अद्भूत क्षमतेमुळे हे कीटक आजही अस्तित्वात आहेत.

झुरळ करतात काही आजारांचे वहन - अमेरिकन कॉक रोचं, जर्मन कॉकरोच, ब्राउन बँडेड, ओरिएंटल कॉकरोचं ई. मानवी परिसरात सामान्यतः आढळनाऱ्या झुरळ प्रजाती टॉयफाईड,साल मोनेला, ई. कोलाय सारख्या जिवाणू चे वहन करून आजार निर्माण करू शकतात. त्यांची वाळ लेली विष्टा दमा -अस्थमा ही निर्माण करते.


# कांजूर डम्पिंगच्या विषारी विळख्यात ईशान्य मुंबई; पालिकेच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांचे आयुष्य धोक्यात

## कांजुर डम्पिंग ग्राऊंड जागतीक प्रदुषणात १२ व्या स्थानावर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी) :** मुंबईतील कांजूरमार्ग डम्पिंग ग्राऊंडने आता जागतिक स्तरावरही मुंबईची बदनामी केली आहे. युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, लॉस एंजेलिस (UCLA) यांच्या २०२६ च्या STOP Methane Project अहवालानुसार कांजूरमार्ग लँडफिलला जगातील सर्वाधिक प्रदूषित लँडफिल्समध्ये १२वा क्रमांक मिळाला आहे. दर तासाला तब्बल ४.९ टन मिथेन वायूची गळती होत असल्याचे या अहवालात स्पष्ट झाले असून, हे प्रदूषण जवळपास दहा लाख SUV वाहनांच्या प्रदूषणाइतके धोकादायक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र इतक्या गंभीर परिस्थितीनंतरही मुंबई महापालिका आणि राज्य सरकार केवळ आश्वासनांची धूळफेक करत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

कांजूर डम्पिंग ग्राऊंडमुळे कांजूरमार्ग, भांडुप, मुलुंड, विक्रोळी परिसरातील लाखो नागरिकांचे जीवन अक्षरशः नरकयातना बनले आहे. दुर्गंधी, प्रदूषित हवा, वारंवार लागणाऱ्या आगी व मिथेन वायूच्या वाढत्या प्रमाणामुळे नागरिकांना श्वसनाचे विकार, त्वचारोग, फुफ्फुसांचे आजार, दमा, ॲलर्जी यांसारख्या गंभीर आजारांनी ग्रासले आहे. विशेषतः लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य सर्वाधिक धोक्यात आले आहे. अनेक नागरिकांचे आयुमान कमी होत असल्याची भीती स्थानिकांकडून



व्यक्त केली जात आहे. मुंबईतील जवळपास ९० टक्के घनकचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या या कचराभूमीबाबत पालिका प्रशासनाची भूमिका मात्र पूर्णपणे बेजबाबदार असल्याचा आरोप होत आहे. उपाययोजना सुरू आहेत, वृक्षलागवड केली जाईल, पर्यायी जागेचा शोध सुरू आहे अशी केवळ कागदी घोषणा करण्यात येत असताना प्रत्यक्षात परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत चालली आहे. १८५ लाख मेट्रिक टनांहून अधिक जुना कचरा या परिसरात साचलेला असून, त्यातून होणारे मिथेन उत्सर्जन थांबविण्यासाठी कोणतीही ठोस व प्रभावी कृती करण्यात आलेली नाही.

या गंभीर प्रश्नावर न्यायालयाने देखील अनेकदा महापालिका व राज्य सरकारची कानउघाडणी केली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याबद्दल न्यायालयाने कठोर निरीक्षणे नोंदविली, तरीही प्रशासन जागे झालेले दिसत नाही. पर्यावरण व सार्वजनिक आरोग्य या दोन्ही आघाड्यांवर पालिकेचे अपयश उघड झाले असून, नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेला हा खेळ थांबविण्याची मागणी आता अधिक तीव्र होत आहे. ईशान्य मुंबई महाविकास आघाडीचे खासदार संजय दिना पाटील यांनी हा मुद्दा सातत्याने आक्रमकपणे मांडला आहे. पालिका आयुक्तांसोबतच्या बैठका, डीपीडीसी बैठका तसेच दिल्लीतील लोकसभेतही त्यांनी ईशान्य मुंबईतील डम्पिंगमुळे नागरिकांच्या आरोग्यावर होत असलेल्या गंभीर परिणामांचा मुद्दा वारंवार उपस्थित केला आहे. याबाबत त्यांनी अनेकदा पत्रव्यवहार करून प्रशासनाला धारेवर धरले आहे. मुंबईकरांच्या जीवाशी खेळ थांबवा, कांजूर डम्पिंगला पर्याय द्या, अशी ठाम भूमिका त्यांनी सातत्याने घेतली असून, स्थानिक नागरिकांच्या आरोग्यासाठी त्यांनी मोठा लढा उभारला आहे. दरम्यान, देवनार येथे ६०० टन कचऱ्यावर प्रक्रिया करून सात मेगावॅट वीजनिर्मितीचा प्रकल्प उभारण्याचे पालिकेने जाहीर केले असले तरी प्रत्यक्षात त्यातून नागरिकांना किती दिलासा मिळणार, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हजारो कोटींचे प्रकल्प जाहीर करूनही प्रदूषण व दुर्गंधी कमी करण्यात पालिका पूर्णपणे अपयशी ठरल्याची टीका होत आहे. कांजूर डम्पिंग ग्राऊंड आता केवळ कचराभूमी राहिलेली नसून ती ईशान्य मुंबईतील लाखो नागरिकांच्या आरोग्यावर घोंगावणारे "विषारी संकट" बनले आहे. प्रशासन अजून किती नागरिकांचे आरोग्य धोक्यात घालणार आणि या प्रश्नावर ठोस निर्णय कधी घेणार, असा संतप्त सवाल आता स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# जे एन पी ए ते सफाळे डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर मार्ग कार्यान्वित
# वाढवण बंदर कनेक्टिव्हिटी साठी DFC अत्यंत महत्त्वाचा

दैनिक युवक आधार

**पनवेल प्रतिनिधी :** भारत सरकारच्या डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांच्यावतीने उभारण्यात येणाऱ्या मालवाहतुकीसाठी विशेषत्वाने राखीव लोहमार्गाचा पहिला टप्पा २५ मे रोजी कार्यान्वित करण्यात आला. जे एन पी ए ते सफाळे असा टप्पा कार्यान्वित झालेला असून महत्त्वाच्या बंदरांवरती मालवाहतूक करण्याच्या दृष्टिकोनातून हा प्रकल्प गेम चेंजर समजला जात आहे. जे एन पी ए चे न्हावा शेवा येथील बंदर तसेच पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यामध्ये निर्माण होणारे वाढवण बंदर यांच्या देशातील विविध ठिकाणी जोडणीसाठी डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर अत्यंत महत्त्वाचा दुवा मानला जातो.

रेल्वे मंत्रालयाने २५ मे रोजी प्रसिद्धी माध्यमांतून डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर चा जे एन पी ए ते सफाळे हा टप्पा कार्यान्वित होत असल्याचे जाहीर केले.या प्रकल्पांमुळे मालवाहतुकीचा वेळ आणि खर्च मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. प्रवासी आणि मालवाहतूक दोन्ही मार्ग वेगळे झाल्यामुळे प्रवाशांच्या गाड्यांचे वेळापत्रक सुधारण्यास मदत देखील होणार आहे.या मार्गांवर गाड्या ताशी १०० किमी




वेगाने धावू शकतात. तसेच, यावर डबल-डेकर कंटेनर आणि प्रचंड वजनाच्या (१३,००० टन) मालगाड्या चालवण्याची विशेष सोय आहे. तूर्तास सुरू झालेला टप्पा हा वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर चा भाग आहे यात जेएनपीटी (नवी मुंबई) ते दादरी (उत्तर प्रदेश) पर्यंतचा हा सुमारे १५०६ किमी लांबीचा मार्ग आहे.

महाराष्ट्रात मुंबई आणि जवाहरलाल नेहरू बंदर (जेएनपीए) ही केवळ दोन प्रमुख बंदरे आहेत. मुंबई बंदराच्या सभोवतालच्या शहराच्या विकासामुळे तसेच बंदरातील मर्यादित खोलीमुळे, जिथे फक्त लहान जहाजेच नांगरता येतात, गेल्या अनेक दशकांपासून मालवाहतुकीवर मर्यादा आल्या आहेत. मुंबईच्या उत्तरेकडील वाढवण येथील अरबी किनारा नवीन बंदराच्या विकासासाठी सर्वात योग्य आणि आदर्श आहे, जिथे सुमारे साडेचार सागरी मैलांच्या अंतरावर २० मीटरची नैसर्गिक खोली उपलब्ध आहे. हे ठिकाण राष्ट्रीय रेल्वे जाळ्यापासून सुमारे १० किमी आणि राष्ट्रीय महामार्ग ८ पासून सुमारे ३५-४० किमी अंतरावर आहे.केंद्र सरकारने या बंदरासाठी तब्बल ७६ हजार २०० कोटी रुपयांची मंजुरी दिली. महाराष्ट्रासाठी हा महत्त्वाचा प्रकल्प तर आहेच, पण पूर्णपणे तयार झाल्यानंतर वाढवण बंदर हे जगातील सर्वात मोठ्या दहा बंदरांपैकी एक असणार आहे. हा प्रकल्प दोन फेजमध्ये पूर्ण केला जाणार असून पहिला फेज २०२९ पर्यंत पूर्ण केला जाणार आहे.

वाढवण बंदराच्या निर्मितीची प्रक्रिया सुरू झालेली असून हे बंदर पूर्ण होण्याच्या अगोदरच त्याची रेल्वे मार्गे आणि रस्ता मार्गे देशातील महत्त्वाच्या शहरांशी जोडणीचे काम देखील समांतर पातळीवर सुरू झालेले आहे. ज्या प्रकारे वाढवण बंदर रेल्वे मार्गाने जोडण्याच्या प्रक्रियेतील पहिला टप्पा पूर्ण झाला आहे त्याचप्रमाणे ते रस्ता मार्गे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाला जोडण्याचे काम देखील हाती घेण्यात आले आहे.या महत्त्वाकांक्षी जोडणी प्रकल्पामुळे वाढवण बंदरावरून होणारी आंतरराष्ट्रीय मालवाहतूक देशाच्या इतर भागांत जलद आणि स्वस्त दरात पोहोचणे शक्य होणार आहे. हा जोडमार्ग डहाणू जवळील वाढवण (तवा) येथून सुरू होऊन नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील भरवीर येथे समृद्धी महामार्गाला जोडला जाईल.या द्रुतगती महामार्गामुळे पालघर ते नाशिक दरम्यानचा ५ तासांचा प्रवास अवघ्या ९० मिनिटांत (दीड तासात) पूर्ण होईल.या प्रकल्पासाठी सुमारे १४,००० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

वाढवण बंदराच्या अनन्य साधारण महत्त्वामुळे ते पूर्ण होण्याच्या अगोदरच बंदर जोडणीचे काम प्राधान्य क्रमाने सुरू झाले आहे. वाढवण बंदर निर्मितीमुळे पालघर जिल्ह्यातील तरुणांना रोजगार तसेच व्यवसाय संधी उपलब्ध होतील. परंतु दळणवळणाची साधने मुबलक प्रमाणात उपलब्ध झाल्याने देखील रोजगार सुलभता आणि व्यवसाय संधी निर्माण होणार आहेत.

## लाथा बुक्क्यांनी मारहाण करून पायाचे हाड केले फ्रॅक्चर

दैनिक युवक आधार

**नवीन पनवेल वार्ताहर :** सात आणि आठ वर्षीय मुले मोबाईलवर अश्लील फोटो आणि व्हिडिओ पाहत असताना फिर्यादीने दोघांच्या कानाखाली मारली. याचा राग आल्याने फिर्यादीला चौघा जणांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली आणि कोणत्यातरी वस्तूने पायावर मारून त्यांचे पायाचे हाड फ्रॅक्चर केले. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात 28 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.यातील फिर्यादी हे टिटवाळा येथे राहत असून ते त्यांच्या बहिणीच्या घरी नवीन पनवेल येथे गेले होते. यावेळी त्यांचा सात वर्षीय भाचा आणि आरोपीचा आठ वर्षीय नातू हे मोबाईलवर अश्लील फोटो आणि व्हिडिओ पाहत होते. त्यावेळी फिर्यादीने दोघांच्याही कानाखाली मारली. या गोष्टीचा राग आल्याने चारही आरोपींनी मिळून फिर्यादीला लाथाबुक्याने मारहाण करून शिवीगाळ केली आणि एका आरोपीने त्यांच्या पायावर मारून पायाचे हाड फ्रॅक्चर केले.

## एसटी चालकाला हातोड्याने केली मारहाण

दैनिक युवक आधार

**नवीन पनवेल वार्ताहर :** एसटी चालकाला लोखंडी हातोड्याने मारहाण केल्याप्रकरणी आरोपी विलास आल्या म्हात्रे (राहणार मोहोगाव) यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 28 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.प्रशांत सूर्यवंशी हे 28 मे रोजी दुपारी तीनच्या सुमारास एसटी महामंडळाची बस घेऊन पुणे ते मुंबई घेऊन जात होते. यावेळी शिवशंभो नाका ट्रॅफिक चौकीसमोर पळस्पे पनवेलकडे जाणारे रस्त्यावर रिक्षा क्रमांक एम एच 46 बीपी 4484 वरील चालक विलास म्हात्रे यांनी एसटी बस त्याच्या रिक्षाच्या अगदी जवळ जाऊन थांबवल्याचा राग मनात धरून त्यांच्या कानशिलात लगावली आणि त्यांना शिवीगाळ केली. आणि त्याच्याजवळ असलेल्या लोखंडी हातोड्याने डोक्यावर जोराने फटका मारला आणि यात ते गंभीर जखमी झाले. याप्रकरणी रिक्षा चालकाविरोधात हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल

दैनिक युवक आधार

**नवीन पनवेल वार्ताहर :** महिलेच्या घरात शिरून तिचा विनयभंग करून तुझा बलात्कार करू व तुम्हा सर्वांना मारून टाकू अशी धमकी दिल्या प्रकरणी अफजलखान आणि सिराज खान यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात 28 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. तीन मे रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास पीडित महिलेच्या घरी येऊन आरोपींनी शिवीगाळ केली आणि तू काही बोललीस तर तुला मारून टाकेल असे बोलून आरोपी अफजल खान याने महिलेसोबत जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला आणि सिराज खान याने त्या महिलेचा विनयभंग केला. यावेळी ओरडलीस तर आम्ही तुला उचलून नेऊन तुझ्यावर बलात्कार करू आणि तुम्हा सर्वांना मारून टाकू अशी धमकी दिली.

## 41 लाख 46 हजारांची फसवणूक

दैनिक युवक आधार

**नवीन पनवेल वार्ताहर :** सदनिका न देता पैसे परत न केल्याने आयुष अग्रवाल, विनय अग्रवाल आणि देवेंद्र केडिया यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात 28 मे रोजी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.नरेंद्र पाडवी हे रोडपाली येथे राहत असून त्यांनी आयुष अग्रवाल यांच्यामार्फतीने बालाजी सिंफनी, सुकापूर मधील सदनिका बुक केली होती आणि त्यांनी या सदनिकेसाठी नऊ लाख एक हजार रुपये ऑनलाईन आणि 32 लाख 45 हजार रुपये रोख असे एकूण 41 लाख 46 हजार 630 रुपये बिल्डर आणि मॅनेजर यांना दिली. मात्र यातील आरोपींनी संगणमत करून त्यांच्याकडून रक्कम घेतली आणि त्यांना सदनिका न देता त्यांचे पैसे देखील परत केले नाहीत. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत.

## मेंडका येथील जेष्ठ नागरिक सय्यद इब्राहिम हैदरसाब यांचे निधन

दैनिक युवक आधार

**प्रतिनिधी प्रकाश गवारे :** मेंडका येथील जेष्ठ नागरिक सय्यद इब्राहिम हैदरसाब यांचे शुक्रवार दि. २९ मे २०२६ रोजी सकाळी ठिक ८:०० वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.स्वभावाने प्रेमळ, मनमिळावू व समाजात आदराचे



स्थान असलेल्या सय्यद इब्राहिम हैदरसाब यांच्या पश्चात कुटुंबीय व आप्तेष्ट असा मोठा परिवार आहे.त्यांचा अंत्यविधी आज रात्री ९:०० वाजता मेंडका येथे होणार आहे.ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व परिवारास दुःख सहन करण्याची शक्ती देवो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली.

## नवीन पनवेल सेक्टर १३ मध्ये अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

दैनिक युवक आधार

**पनवेल प्रतिनिधी :** नवीन पनवेल सेक्टर १३ येथील डॉल्फिन इमारतीच्या बाजूला असलेल्या ब्रिजखाली एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सदर मृतदेह गेल्या आठवडाभरापासून त्या ठिकाणी पडून असल्याची प्राथमिक



माहिती समोर आली आहे.मृत व्यक्तीचे वय अंदाजे ४० वर्षे असल्याचे घटनास्थळी पाहणी करणाऱ्या पोलिसांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच खांडेश्वर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.सदर इसमाची ओळख अद्याप पटलेली नसून, या व्यक्तीबाबत कुणाला काही माहिती असल्यास त्यांनी तात्काळ खांडेश्वर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.या प्रकरणाचा पुढील तपास खांडेश्वर पोलीस करीत आहेत.

## पाटोदा तालुक्यात पांदण रस्त्यांच्या कामात मोठा भ्रष्टाचार

### वंचित बहुजन आघाडीचा ४ जून रोजी 'कुलूप ठोक' आंदोलनाचा इशारा

दैनिक युवक आधार

**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा तालुक्यातील पांदण रस्त्यांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार, बोगसगिरी आणि निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. या संदर्भात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन विलास मेघडबर आणि माजी तालुका अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांनी गट विकास अधिकारी (BDO), पंचायत समिती पाटोदा यांना लेखी निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला आहे. पाटोदा तालुक्यात सध्या पांदण रस्त्यांची अनेक कामे सुरू आहेत, परंतु ही कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची आणि नियमबाह्य पद्धतीने केली जात असल्याचा निवेदनात म्हटले आहे. प्रत्यक्ष कामावर मजूर हजर नसतानाही त्यांची बोगस हजेरी लावणे आणि बनावट (Duplicate) जीएसटी बिले जोडून शासनाची आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, या भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना काही ठिकाणी राजकीय कार्यकर्त्यांकडून मारहाण आणि दमदाटी केली जात आहे. प्रशासकीय दुर्लक्षामुळे अशा गुंडप्रवृत्तीच्या लोकांचे धाडस वाढत चालले असून कार्यकर्त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पूर्वी दोन ते तीन वेळा लेखी तक्रारी देऊन ही पंचायत समिती कार्यालयाने या वर कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही, ज्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर, सचिन मेघडबर यांनी मागणी केली आहे की, या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ निष्पक्ष चौकशी व्हावी, दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी आणि चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित कामांची बिले कोणत्याही परिस्थितीत अदा करू नयेत. जर प्रशासनाने या निवेदनाची तातडीने दखल घेऊन कारवाई सुरू केली नाही, तर येत्या ०४/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता पाटोदा पंचायत समिती कार्यालयाला 'कुलूप ठोक' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीला सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असे ही या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. सदर पत्राच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार पाटोदा आणि पोलीस निरीक्षक पाटोदा यांना ही पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

## गरीब परिस्थितीवर मात करत होमगार्ड जवान अनिल शितळे यांची महाराष्ट्र पोलीस दलात निवड

दैनिक युवक आधार

**अर्धापूर प्रतिनिधी /अरविंद पांचाळ :** जिद्द, चिकाटी आणि अथक मेहनतीच्या जोरावर कोणतेही स्वप्न पूर्ण होऊ शकते, हे अनिल बबन शितळे यांनी सिद्ध करून दाखवले आहे .



अत्यंत गरीब परिस्थितीत जीवन जगत, गेल्या पाच वर्षांपासून होमगार्ड म्हणून सेवा बजावत असलेल्या अनिल शितळे यांची महाराष्ट्र पोलीस भरतीमध्ये निवड झाली असून त्यांच्या या यशामुळे संपूर्ण गावात व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

लहानपणापासूनच आर्थिक अडचणींचा सामना करत अनिल यांनी शिक्षण पूर्ण केले. कुटुंबाची जबाबदारी सांभाळत त्यांनी होमगार्डमध्ये सेवा सुरू केली. अल्प मानधनात घरखर्च भागवित असतानाच पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न त्यांनी डोळ्यांसमोर ठेवले होते. दिवसभर कर्तव्य बजावून रात्री उशिरापर्यंत अभ्यास, मैदानावर सराव आणि शारीरिक तयारी असा त्यांचा संघर्षमय दिनक्रम सुरू होता.

अनेक वेळा अपयश आले, परिस्थितीने खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला, मात्र अनिल यांनी हार मानली नाही. कुटुंबीयांचा पाठिंबा आणि स्वतःची जिद्द यांच्या जोरावर त्यांनी अखेर महाराष्ट्र पोलीस भरती परीक्षेत यश संपादन केले. त्यांच्या निवडीची बातमी समजताच गावातील नागरिक, मित्रपरिवार आणि नातेवाईकांनी त्यांचे अभिनंदन करून आनंद व्यक्त केला.

गावातील ज्येष्ठ नागरिकांनी "अनिलचे यश हे गावासाठी अभिमानाची बाब असून आजच्या तरुणांनी त्यांच्या संघर्षातून प्रेरणा घ्यावी," अशा भावना व्यक्त केल्या. अनेक सामाजिक कार्यकर्ते, मित्रमंडळी तसेच होमगार्ड सहकाऱ्यांनीही अनिल शितळे यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

अनिल शितळे यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील अनेक युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. आर्थिक परिस्थिती कितीही कठीण असली तरी मेहनत, प्रामाणिकपणा आणि सातत्य यांच्या जोरावर यश नक्की मिळते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

"होमगार्डच्या गणवेशातून पोलीस दलाच्या वर्दीपर्यंतचा हा प्रवास संघर्षमय असला तरी तो माझ्यासाठी अभिमानाचा क्षण आहे,"

अशी भावना अनिल बबन शितळे यांनी व्यक्त केली.

संतवाणी — आध्यात्मिक विचारांचा जागर

## संतसंगती : जीवनाला योग्य दिशा देणारी दिव्य शक्ती

• संत आपल्याला जागे करतात. •

मानवी जीवनावर संगतीचा मोठा प्रभाव पडत असतो. जशी संसारात चांगल्या किंवा वाईट संगतीचा परिणाम माणसाच्या विचारांवर आणि वर्तनांवर होतो, तसाच परिणाम परमार्थनच्या क्षेत्रातही होत असतो. त्यामुळे प्रत्येकाने चांगल्या विचारांच्या, सद्‌गुणी आणि सात्विक व्यक्तींची संगत धरली पाहिजे. चांगले-वाईट याचे मोजमाप दुसऱ्यांच्या दोषांवरून नव्हे, तर स्वतःच्या आचरणावरून केले पाहिजे. मात्र अनेकदा स्वतःला सुधारण्याऐवजी आपण जग सुधारण्यांच्या मागे लागतो, हीच आपली मोठी चूक ठरते.

### संत आपल्याला जागे करतात

संतांचे अस्तित्व आणि त्यांचे महत्व अनेकांना समजत नाही. संत ओळखण्यासाठी मनामध्ये भगवंताविषयी प्रेम, श्रद्धा आणि भक्ती असणे आवश्यक आहे. जीवनाचे खरे ध्येय विसरलेल्या माणसाला जागृत करण्याचे कार्य संत करतात. चुकींच्या मार्गावर चालणाऱ्या व्यक्तीला योग्य दिशा दाखवून, "तू वाट चुकला आहेस" याची जाणीव करून देतात. त्यामुळे माणूस पुन्हा योग्य मार्गावर येऊन आपल्या अंतिम ध्येयाकडे वाटचाल करू लागतो.

### संतांचे कार्य लोककल्याणासाठी

संत हे स्वतः आनंदरूप झालेले असतात. मात्र ते त्या आनंदातच रमून न बसता समाजाच्या कल्याणासाठी कार्यरत राहतात. त्यांच्या प्रत्येक कृतीत लोककल्याणाचा हेतू असतो. ते शांत दिसत असले तरी त्यांच्या विचारांनी, कृतींनी आणि आशीर्वादांने समाजाचे कल्याण सुरूच असते.

### संतांचा उपदेश निस्वार्थ असतो

संतांचा उपदेश हा त्यांच्या स्वार्थासाठी नसतो. त्यांनी अनुभवलेले सत्य, त्यांनी मिळविलेला आनंद आणि समाधान समाजालाही प्राप्त होते, हीच त्यामागची शुद्ध भावना असते. म्हणूनच संतांचे वचन हे विश्वासाने ऐकले पाहिजे आणि त्यानुसार आचरण केले पाहिजे. प्रपंचांतील दुःखांची जाणीव झाल्यावर त्यावर उपाय शोधण्यांची गरज असते. हा उपाय संतांनी लिहिलेल्या ग्रंथांमधून मिळतो.

### ग्रंथवाचन आणि आचरण आवश्यक

संत साहित्याचे केवळ वाचन करून उपयोग होत नाही; त्या वाचनाचे मनन आणि चिंतन झाले पाहिजे. ग्रंथांमध्ये सांगितलेल्या गोष्टी जीवनात उतरवल्या तरच त्यांचा खरा लाभ होतो. साधना आणि वाचन यांचा समतोल साधला तर अध्यात्मिक प्रगतीचा मार्ग अधिक सुकर होतो.



हभप संजय घोडके महाराज
वाहिरा

### संतकृपेने होते ज्ञानप्रकाश

संतांच्या कृपेशिवाय त्यांच्या ग्रंथांचा खरा अर्थ समजणे कठीण असते. ज्याच्यावर संतांची कृपा असते, त्याला मोठी विद्वत्ता नसली तरी त्या ग्रंथांतील गुढ अर्थ सहज समजतो. विद्वान व्यक्ती कल्पनेने सत्याचे वर्णन करते; परंतु संत अनुभवाच्या बळावर सत्याचे स्वरूप स्पष्ट करतात. म्हणूनच सत्पुरूषांच्या वचनांवर विश्वास ठेवून त्यानुसार जीवन जगणे, हाच खरा सत्संग आणि सत्समागम होय.

### आजच्या जीवनात संतविचारांचे महत्व

आजच्या धावपळींच्या आणि तणावग्रस्त जीवनात संतांचे विचार अधिक महत्वाचे ठरतात. संतांची शिकवण माणसाला आत्मपरीक्षण, सदाचार आणि ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवते. त्यांच्या आज्ञेचे पालन करणे म्हणजेच खरी संतसेवा होय. संतांनी दाखविलेल्या मार्गावर चालल्यास जीवनात समाधान, शांती आणि आत्मिक आनंद निश्चित प्राप्त होतो.

"संतांची आज्ञा पालन करणे म्हणजेच संतसेवाच होय."

**संतसंगतीचे फायदे**

- मन शुद्ध होते आणि विचार सकारात्मक बनतात.
- जीवनाला योग्य दिशा मिळते.
- आत्मविश्वास आणि धैर्य वाढते.
- संकटात धीर आणि मार्गदर्शन मिळते.
- ईश्वरभक्तीची गोडी निर्माण होते.
- दुःखातून सुखाकडे वाटचाल होते.

संतांची संगत हीच खऱ्या अर्थाने जीवनाची दिशा बदलणारी आणि मुक्तीकडे नेणारी अभयसंपन्न वाट आहे.

## अभिनेते रितेश देशमुख यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार

मनोरंजन, क्रीडा, सामाजिक कार्य, प्रशासन, उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान करणारा 'झी २४ तास' वृत्तवाहिनीचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार वितरण सोहळा नुकताच यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पार पडला. महाराष्ट्र गौरव पुरस्काराच्या यंदाच्या दुसऱ्या पर्वात अभिनेते रितेश देशमुख यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



या महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी 'झी २४ तास'चे संपादक कमलेश सुतार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची खास मुलाखत घेतली. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, एस्सेल/झी समूहाचे अध्यक्ष आणि मार्गदर्शक डॉ. सुभाष चंद्रा, महाराष्ट्र शासनाचे आमदार रवींद्र चव्हाण, आमदार प्रसाद लाड, मुंबई भाजप अध्यक्ष आणि आमदार अमित साटम, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, तसेच पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलगुरू आणि कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते.'महाराष्ट्र हे नेहमीच विविध क्षेत्रांतील असामान्य प्रतिभा, नवकल्पना आणि नेतृत्वाचे केंद्र राहिले आहे. 'महाराष्ट्र गौरव पुरस्कारां'सारखे उपक्रम समाजावर सकारात्मक प्रभाव टाकणाऱ्या आणि राज्याच्या प्रगतीला बळकटी देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात', अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पुरस्कार सोहळ्याचे कौतुक केले. तर अशा पुरस्कारांमुळे विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्यांना उत्कृष्टतेसाठी प्रेरणा मिळते आणि पुढील पिढ्यांनाही प्रेरित करण्याचे काम होते, अशी भावना रितेश देशमुख यांनी पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केली.यंदाच्या पुरस्कार सोहळ्यात अभिनेत्री गिरिजा ओक- गोडबोले, अभिनेते सचिन कुमावत आणि कंटेट क्रिएटर सिद्धेश लोकरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल गौरव करण्यात आला.

तसेच, अभिनेत्री आणि नृत्यांगना शर्वरी जमेनीस, अभिनेत्री हेमल इंगळे, अभिनेते अभिजित खांडकेकर आणि अभिनेता पुष्कर जोग यांनी कार्यक्रम सादर करत सोहळ्याची रंगत वाढवली.

# मौल्यवान जीवनापेक्षा शरीर पोकळणाऱ्या व्यसनाधीनतेला महत्त्व ?

तंबाखू हे आपल्या आजूबाजूला सहज उपलब्ध असलेले विष आहे. त्याच्या संभाव्यतेबद्दल, त्यामुळे होऊ शकणाऱ्या जीवघेण्या आजारांबद्दल आणि धोक्यांबद्दल आपणा सर्वांनाच चांगली जाणीव आहे. आपण टीव्ही, वर्तमानपत्रे आणि सोशल मीडियावर तंबाखूविषयी जनजागृतीच्या जाहिराती पाहतो. निरक्षरांपासून ते उच्चशिक्षितांपर्यंत, सर्व वयोगटातील लोकांना त्याच्या दुष्परिणामांची साधारणपणे जाणीव आहे, पण ते, ही गोष्ट गांभीर्याने घेत नाहीत. हीच आपल्या समाजासमोरील सर्वात मोठी समस्या आहे. अगदी लहान शाळकरी मुलेही आपल्या डोळ्यांदेखत तंबाखू खातांना दिसतात. चौकात, पानटपरी वर प्रतिष्ठित घराण्यातील मुली आणि नामांकित शाळांमधील विद्यार्थीदेखील सिगारेट ओढताना दिसतात. मोठ्या शहरात तर फॅशनच्या नावाखाली सर्रास उघडपणे व्यसन करतात. गावांमध्ये आणि शहरांमध्येही तंबाखू वापरणाऱ्यांची संख्या खूप जास्त आहे. तंबाखू आणि सिगारेटच्या पाकिटांवर धोक्याच्या सूचना दिलेल्या असतात, त्या वाचून आणि होणाऱ्या जीवघेण्या आजारांची चित्रे कशी समजून घ्यायची हे ही सर्वांना माहीत असते, पण त्या माहितीकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. या वर्षी जागतिक तंबाखू विरोधी दिन २०२६ ची संकल्पना "आकर्षणाचा पर्दाफाश – निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनाशी लढा" ही आहे.



लोकांनी व्यसनाबद्दल असे गैरसमज निर्माण केले आहेत की, जणू त्यांचे आयुष्यच त्यासाठी समर्पित आहे. काही म्हणतात की तंबाखूमुळे त्यांची पचनक्रिया सुधारते, काही म्हणतात की तंबाखूमुळे त्यांना चांगली झोप लागते, काही म्हणतात की तंबाखू ओढल्याने त्यांना कामावर लक्ष केंद्रित करण्यास मदत होते. ते तंबाखू ओढायला सुरुवात करतात आणि मग त्याचे व्यसनात रूपांतर करतात. हळूहळू, तंबाखू शरीराला कमजोर करू लागतो, त्याचे अवयव पोखरतो आणि त्यांना महागड्या, असाध्य रोगांच्या उंबरठ्यावर आणून ठेवतो. आपण आपली सगळी संपत्ती खर्च केली तरी, मृत्यूला जीवनात बदलू शकत नाही. मग आपले व्यसन भागवण्यासाठी आपण हे मौल्यवान आयुष्य जीवघेण्या आजारांना का बळी देतो? इतरांना देखाव्याच्या इच्छेपोटी आणि पालकांच्या नियंत्रणाच्या अभावामुळे किशोरवयीन आणि तरुण पिढी तंबाखू, सिगारेट आणि हुक्का ओढायला सुरुवात करते. आधुनिकतेच्या या भ्रमात, शहरांमध्ये हुक्का पार्लरचे एक नवीन साम्राज्य फोफावत आहे, जे तरुणांच्या व्यसनाला खतपाणी घालत आहे.

तंबाखूचे सेवन विविध प्रकारे केले जाते, जसे : बिडी, सिगारेट, हाताने गुंडाळलेली सिगारेट, पाईप, सिगार, हुक्का, पाण्याचा पाइप, चुट्टा, धुमटी आणि चिल्लम. शिवाय, तंबाखू-आधारित पान, खैनी, गुटखा, खर्रा आणि तंबाखू पान मसाला देखील वापरला जातो. मिश्री, गुल, बज्जर, गुडाखू इत्यादी तंबाखूजन्य पदार्थ दातांना आणि हिरड्यांना लावले जातात आणि नस्य हुंगले जाते. भारतात तंबाखूच्या सेवनामुळे दररोज अंदाजे ३,५०० मृत्यू होतात. भारतात १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाचे २६.७ कोटी लोक तंबाखूचे सेवन करतात. २०११ मध्ये, ३५ ते ६९ वयोगटातील लोकांसाठी तंबाखू सेवनाचा आर्थिक खर्च १,०४,५०० कोटी रुपये होता.

जेव्हा एखादी व्यक्ती स्वतः धूम्रपान करत नाही, परंतु दुसऱ्याद्वारे केलेल्या धूम्रपानाच्या धुराच्या संपर्कात येते आणि ऑक्सिजनसह तो धूर शरीरात श्वासावाटे आत घेते, तेव्हा ती व्यक्ती 'सेकंड-हँड स्मोकर' असते. आपल्या घरात किंवा घराच्या आसपास कोणीही धूम्रपान करत असल्याचे आपण अनेकदा पाहतो, ज्याचा धूर संपूर्ण घरात पसरतो आणि घरातील इतर सदस्यही त्या धुराचे बळी ठरतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, जे तंबाखूचे सेवन सोडत नाहीत, त्यांपैकी निम्म्याहून अधिक लोकांचा मृत्यू तंबाखूमुळे होतो. तंबाखूमुळे दरवर्षी ७० लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू होतो; यापैकी, अंदाजे १६ लाख लोकांचा मृत्यू अप्रत्यक्ष धूम्रपानाच्या संपर्कामुळे होतो. तंबाखूशी संबंधित आजारांमुळे अपंगत्व आणि दीर्घकाळ चालणारी, वेदनादायी आजारही होतात.

देशात दरवर्षी तंबाखूमुळे १३.५ लाखांहून अधिक अकाली मृत्यू होतात, ज्यामध्ये धूम्रपान आणि अप्रत्यक्ष धूम्रपानामुळे होणाऱ्या अंदाजे १२ लाख मृत्यूंचा समावेश आहे. धूरविरहित तंबाखूमुळे निर्माण होणाऱ्या जागतिक आरोग्य भारापैकी ७० टक्के भार भारताचा आहे. धूरविरहित तंबाखूच्या सेवनामुळे दरवर्षी २,३०,००० हून अधिक भारतीयांचा मृत्यू होतो. भारतातील तोंडाच्या कर्करोगाची जवळपास ९० टक्के प्रकरणे धूरविरहित तंबाखूच्या सेवनामुळे होतात. बिडी आणि सिगारेट ओढणारे लोक धूम्रपान न करणाऱ्यांपेक्षा ६ ते १० वर्षे लवकर मरतात. भारतातील कर्करोगाच्या एकूण प्रकरणांपैकी २७ टक्के प्रकरणे तंबाखूच्या वापरामुळे होतात. तंबाखू हा कर्करोग, हृदयरोग, मधुमेह, फुफ्फुसांचे जुनाट आजार, पक्षाघात, वंध्यत्व, अंधत्व, क्षयरोग, तोंडाचे आजार आणि इतर अनेक आजारांसाठी एक अत्यंत धोकादायक घटक आहे. पुरुषांमध्ये ५० टक्के आणि महिलांमध्ये २० टक्के कर्करोगाची प्रकरणे तंबाखूमुळे होतात. तंबाखूमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला दरवर्षी अंदाजे ₹१७७३.४ अब्ज इतका फटका बसतो, जो देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या जीडीपी १ टक्क्या पेक्षा जास्त आहे.

भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाअंतर्गत तंबाखू मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. देशातील तंबाखू उद्योगाचा नियोजित विकास सुनिश्चित करणे, हा तंबाखू मंडळ अधिनियम, १९७५ चा उद्देश आहे. त्याच सरकारी वेबसाइटवरून मिळालेल्या माहितीनुसार, २०२३-२४ या वर्षात भारतीय तंबाखू निर्यातीचे मूल्य १२,००५.८९ कोटी रुपयांवर पोहोचले. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या पाच वर्षांत तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झाले आहे. तंबाखू उद्योग २०२४-२०२५ मध्ये ४६ दशलक्ष लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळाले, तसेच निर्यातीतून ₹१६,७२८.०२ कोटींचा महसूल मिळवले. भारतीय तंबाखूची १२७ देशांमध्ये निर्यातही केली जाते. भारत हा तंबाखूचा दुसरा सर्वात मोठा ग्राहक आणि उत्पादक देश आहे. भारतीय तंबाखू उद्योगाचे मूल्य १.१६ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे, एकट्या सरकारलाच दरवर्षी तंबाखू उत्पादनांवरून कराच्या स्वरूपात ७६,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई होते. 'निकोटिन अँड टोबॅको रिसर्च' या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या एका शोधनिबंधानुसार, तंबाखूजन्य पदार्थांवर उत्पादन शुल्क म्हणून गोळा होणाऱ्या प्रत्येक ₹१०० मागे, तंबाखू सेवनामुळे समाजावर ₹८१६ चा आर्थिक भार पडतो. यावरून हे सिद्ध होते की तंबाखूचा वापर हा राष्ट्रीय तिजोरीवर एक मोठा आर्थिक भार आहे.तंबाखू किंवा इतर कोणतेही व्यसन सोडण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपली स्वतःची इच्छाशक्ती. जर आपण दृढनिश्चयी असू, तर आपल्याला पाठिंबा देण्यासाठी अनेक लोक आणि संस्था सेवेत उपलब्ध असतात. तंबाखू सोडल्याने खर्चिक आजार आणि वेदनादायी अकाली मृत्यू टाळता येतात. निर्व्यसनतेमुळे आपल्या शरीरातील अवयव अधिक कार्यक्षमतेने कार्य करू शकतात आणि गंभीर आजारांचा धोका कमी होतो. आरोग्यसेवेवरील खर्च कमी केल्याने, आपण आयुष्यातील इतर महत्त्वाच्या खर्चासाठी अधिक पैसे वाचवतो. तंबाखू सोडणे हे आपल्या मुलांसाठी, कुटुंबासाठी आणि समाजासाठी एक आदर्श निर्माण करते. तंबाखूचे व्यसन सोडण्यासाठी सरकारकडून सुविधाही उपलब्ध आहेत. देशातील विविध राज्यांसाठी तज्ञ समुपदेशकांद्वारे सर्व भाषांमध्ये दूरध्वनी मार्गदर्शन आणि समुपदेशन (टोल-फ्री १८०० ११ २३५६) प्रदान केले जाते. मोबाईलवर (क्रमांक ०११ २२९०१७०१) टेक्स्ट मेसेजद्वारे देखील समुपदेशन दिले जाते.

व्यसनमुक्ती समुपदेशन केंद्रे जिल्हा स्तरावर उपलब्ध आहेत. तंबाखू व्यसनमुक्ती केंद्र किंवा जिल्हा तंबाखू नियंत्रण केंद्र लोकांना त्यांचे व्यसन सोडण्यास मदत करण्यासाठी मोफत वैद्यकीय समुपदेशन, वर्तणूक थेरपी आणि औषधोपचार पुरवते.

आपण शहरभरातील अनेक स्थानिक विशेष वैद्यकीय सुविधा, सामुदायिक व्यसनमुक्ती केंद्रे आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये उपचार घेऊ शकतो. जीवनाचे मूल्य ओळखा, स्वतःची आणि आपल्या प्रियजनांची काळजी घ्या आणि आजच तंबाखू सोडा.

**डॉ. प्रितम भि. गेडाम**

## उन्हाळ्यात फ्रिजचे थंड पाणी पिताय? थांबा, आधी डॉक्टरांचा 'हा' गंभीर इशारा वाचा

उन्हाळ्याच्या दिवसांत बाहेरून घरात आल्यावर लगेच फ्रिजमधील बर्फासारखे थंड पाणी पिण्याची अनेकांना सवय असते. कडक ऊन आणि घामाच्या धारांनंतर हे थंड पाणी आपल्याला तात्काळ आराम नक्कीच देते, परंतु डॉक्टरांच्या मते, खूप जास्त थंड पाणी पिणे शरीरासाठी नेहमीच फायदेशीर नसते. विशेषतः जेव्हा तुमचे शरीर कडक उन्हामुळे आधीच गरम झालेले असते, तेव्हा अचानक बर्फासारखे थंड पाणी प्यायल्याने शरीराला त्रास होऊ शकतो आणि आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात.



**अचानक थंड पाणी का पिऊ नये?**

'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'च्या रिपोर्टनुसार, जेव्हा आपण उन्हातून येतो, तेव्हा आपले शरीर स्वतःचे तापमान कमी करण्याच्या प्रक्रियेत व्यस्त असते. या काळात शरीरातील रक्ताभिसरण वेगवान असते आणि शरीराचे तापमान सामान्य राखण्याचा प्रयत्न सुरू असतो. अशा वेळी अचानक अती थंड पाणी प्यायल्याने शरीराला 'टेंपरेचर शॉक' बसू शकतो. यामुळे रक्तावाहिन्या अचानक आकुंचन पावतात, ज्यामुळे डोकेदुखी, चक्कर येणे किंवा अस्वस्थ वाटणे अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

**आरोग्याला कोणत्या समस्या होऊ शकतात?**

डॉक्टरांच्या मते, थंड पाणी प्यायल्याने तोंड आणि घशाला तात्काळ थंडावा मिळतो, त्यामुळे लोकांना आराम वाटतो. परंतु, अंतर्गत पातळीवर शरीराला हळूहळू थंड होण्याची गरज असते.

**पचनक्रिया मंदावणे:** अती थंड पाणी पचनसंस्थेचा वेग काही काळासाठी मंदावू शकते. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, यामुळे पाचक एन्झाईम्सची कार्यक्षमता कमी होते आणि शरीराला अन्न पचवण्यासाठी जास्त मेहनत करावी लागते. परिणामी, पोट फुगणे, अपचन आणि पोटदुखी यांसारख्या तक्रारी वाढतात.

**घशाचे विकार:** उन्हातून आल्यावर किंवा घाम आल्यावर लगेच चिल्ड पाणी प्यायल्याने घशात जळजळ होऊ शकते. यामुळे घशात खवखव, कफ (बलगम) वाढणे, खोकला आणि घशाचे इन्फेक्शन होण्याची शक्यता वाढते.

**हृदयावर परिणाम:** तज्ज्ञांच्या मते, अती थंड पाण्यामुळे काहींना 'ब्रेन फ्रीज' म्हणजेच अचानक तीव्र डोकेदुखीचा त्रास होऊ शकतो. हे पाणी तोंड आणि घशातील संवेदनशील नसांवर अचानक परिणाम करते. तसेच, ज्यांना आधीच हृदयाचा त्रास आहे, त्यांच्यासाठी तर बर्फासारखे पाणी अतिशय घातक ठरू शकते. अचानक तापमान बदलल्यामुळे 'वेगस नर्व्ह' प्रभावित होते, ज्यामुळे हृदयाचे ठोके किंवा रक्तदाबावर तात्पुरता परिणाम होऊ शकतो.

**उन्हाळ्यात काय करावे?**

डॉक्टरांचा असा सल्ला आहे की, उन्हातून आल्यावर लगेच थंड पाणी पिण्याऐवजी काही मिनिटे शांत बसावे, शरीराचे तापमान सामान्य होऊ द्यावे आणि त्यानंतर सामान्य तापमानाचे किंवा हलके थंड पाणी हळूहळू प्यावे.

उन्हाळ्यात शरीराला चांगल्या प्रकारे हायड्रेट ठेवण्यासाठी फ्रिजच्या पाण्याऐवजी मातीच्या मटक्यातील पाणी, लिंबू पाणी, ताक, शहाळ्याचे पाणी (नारळ पाणी) आणि ओआरएस (ORS) यांसारख्या आरोग्यदायी पर्यायांचा वापर करावा.

## 'नो प्लास्टिक' लाइफस्टाइलकडे तरुणांचा कल

आजची तरुण पिढी फक्त फॅशन किंवा ट्रेंड्सपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याकडेही मोठ्या प्रमाणावर वळताना दिसत आहे. "नो प्लास्टिक" लाइफस्टाइल हा आता फक्त सोशल मीडियावरील ट्रेंड नसून, तो एक जबाबदार आणि जागरूक जीवनाचा भाग बनत चालला आहे. प्लास्टिकमुळे वाढणारं प्रदूषण, समुद्रातील कचरा, प्राण्यांना होणारा त्रास आणि आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन तरुण आता पर्यायी पर्यावरणपूरक वस्तुंना पसंती देत आहेत.



**'नो प्लास्टिक' ट्रेंड का वाढतोय?**

डिजिटल युगात पर्यावरणाशी संबंधित माहिती सहज उपलब्ध होत असल्याने अनेक तरुण पर्यावरणविषयक मुद्द्यांबद्दल अधिक जागरूक झाले आहेत. प्लास्टिकचा वापर कमी केल्याने पृथ्वीचं नुकसान कमी होऊ शकतं, ही भावना त्यांच्यात वाढताना दिसत आहे.

**यामागील काही प्रमुख कारणं :**

– पर्यावरण संवर्धनाबद्दल वाढती जागरूकता.

– सोशल मीडियावरील इको-फ्रेंडली ट्रेंड्स.

– आरोग्याबद्दलची काळजी.

– टिकाऊ आणि साध्या जीवनशैलीकडे वाढता कल.

– प्लास्टिकमुक्त मोहिमा आणि सरकारी उपक्रम.

**तरुण कोणते पर्याय स्वीकारत आहेत?**

आज अनेक तरुण प्लास्टिकच्या वस्तूंऐवजी पुनर्वापर करता येणाऱ्या आणि नैसर्गिक पर्यायांचा वापर करत आहेत. त्यांच्या दैनंदिन जीवनात छोटे-छोटे बदल दिसून येत आहेत. जसं की प्लास्टिक न वापरता स्टील किंवा कॉपरच्या पाण्याच्या बाटल्यांचा वापर, कापडी पिशव्या, बांबू टूथब्रश, काचेच्या किंवा स्टीलच्या डब्या, पेपर किंवा मेटल स्ट्रॉ आणि रीफिल करता येणारी उत्पादने यांचा वापर करत आहेत.

**सोशल मीडियाची मोठी भूमिका**

इन्स्टाग्राम, यूट्यूब आणि पिंटरेस्टसारख्या प्लॅटफॉर्मवर "सस्टेनेबल लिव्हिंग" कंटेंट मोठ्या प्रमाणावर पाहिला जातो. अनेक इन्फ्लुएन्सर्स पर्यावरणपूरक जीवनशैलीचे व्हिडिओ शेअर करत असल्याने तरुणांमध्ये याबद्दल आकर्षण वाढत आहे. "झिरो वेस्ट", "DIY Reuse", "Eco-friendly Hacks" यांसारखे ट्रेंड्स लोकप्रिय होत आहेत.

**'नो प्लास्टिक' लाइफस्टाइलचे फायदे**

पर्यावरणासाठी या लाइफस्टाइलचा फायदा म्हणजे प्लास्टिक कचरा कमी होतो, जलप्रदूषण आणि मातीचं प्रदूषण कमी होतं आणि यामुळे प्राण्यांचंही संरक्षण होतं. आरोग्याच्या दृष्टीनेही याचे फायदे आहेत यामुळे आपला हानिकारक केमिकल्सपासून बचाव होतो. आणि सुरक्षित अन्न साठ्वणही होते. यासोबतच पुनर्वापरामुळे खर्च कमी होतो.

## डोंगराळ भागात उन्हाळी हंगामातील रानभाज्यांची पर्वणी

आदिवासी भाग हा पुर्वीपासून डोंगरमाथ्यांनी सजलेल्या अशा निसर्गाच्या सानिध्यात वास्तव्य करून राहणाऱ्या आदिवासी बाधवांना वनस्पती सृष्टी बरोबरच जंगली रानभाजी हे निसर्गाने वरदानच दिले आहे.नेहमीच ढगाळ वातावरण त्यामुळे या भागात रानभाज्यांची पर्वणी तयार होते . उन्हाळ्यात जंगलात वेगवेगळ्या रानभाज्या उगवतात . डोंगराळ भागात झाड, झुडपं धुंडाळून तर कुठे पडिक माळरानावर जाऊन आदिवासी बांधव रानभाज्या मिळवत असतात.रानभाज्या ह्या बिनखताच्या असल्याने बाजारातही जास्त मागणी असते. शरीरासाठी पौष्टिक आहार चवीला रूचकर आणि पचायला जड जात नाही त्यामुळे शहर वासियांना तर ह्या दिवसांत रानभाज्यांची भुरळच लागलेली असते. बाजारातील भाजी पाल्यांचे भाव वाढले असल्याने आदिवासी बांधव जंगलाची वाटच धरतात.



**१. दिघवढ (दिहगड)**

दिघवढ ही वेलवर्गीय रानभाजी मे महिन्यात झाडाझुडुपांमध्ये उगवते दिघवढीला मऊ काटे असतात कोवळा शेंडा तोडून भाजी करतात.

**२. शेवळा**

कंदवर्गीय रानभाजी उन्हाळ्यात झुडपांमध्ये उगवते काढून निसून घेतात आणि ताज्या कोवळ्या पाल्याची भाजी करतात उडदाच्या डाळीत शीजवतात जास्त चरकट लागू नये म्हणून बोंडार झाडाचा कोवळा पाला टाकतात कोकण परिसरात तर काकडाची फळ कुटून टाकतात त्यामुळे पातळ कालवण अतीशय रूचकर लागते फुललेली शेवळ वाळवून कणीक बनवतात .

**३.लुंढा**

ही वेलवर्गीय रानभाजी उन्हाळ्यात मे महिन्यात झाडाझुडुपांमध्ये उगवते दिघवढी सारखीच पण आकाराने जाड असते काटे नसतात कोवळा शेंडा तोडून भाजी करतात.

**४.रान वाघाट**

रान वाघाट ही काटेरी वेलवर्गीय रानभाजी उन्हाळ्यात वाघाट वेलीला लिंबाच्या आकाराची फळं येतात कच्च्या फळांची साल काढून घेत बी फेकून देतात भाजी चवीला रूचकर लागते. ही वेल झाडाच्या पोकळीत किंवा दाट झुडपांमध्ये पांगलेली असते वेलीला वाघनख्या प्रमाणे काटे असतात म्हणून वाघाट म्हणतात वाघाट भाजीने आम्लपित्त दुर होण्यास मदत होते.

**५. मोखा**

मोखा हा वृक्ष तुरळक प्रमाणात डोंगराळ भागात आढळतो. आदिवासी भागात मे महिन्यात ग्रीष्म ऋतूत मोख्खाला नवी पालवी फुटते त्याची भाजी बनवली जाते अतीशय रूचकर लागते गर्भवती महिलांनी सेवन केल्यास कोनताही अशक्तपणा जाणवत नाही .

**६.मोह टोंळबा**

मोहाचे झाड आदिवासींचे कल्पवृक्ष म्हणून ओळखले जाते. त्याचे वेगवेगळे फायदे आहेत. वाळलेल्या मोह फुलांची दारू गाळणे एप्रिल,मे, जून महिन्यात कच्या फळांची राळ धुऊन घेत साल काढून भाजी करतात परिपक्व झालेल्या टोळंबी पासून तेल गाळतात बाजारातील गोड तेलाच्या किंमती वाढल्या असल्याने आदिवासी बांधव मे, जून महिन्यात मोहाच्या झाडाखाली टोळंबी वेचतात . मोह फळांच्या पीकलेल्या फळातील सालीचा गाभा गोड लागतो. त्यामुळे रात्री वटवाघळे,हारोड, मोहट ( रानमांजर)हे पशू ,पक्षी झाडावर भ्रमंती करतात ती फळं तोडून घेत आंबा झाडावर नेऊन खातात आंब्याच्या झाडाखाली सकाळी मोह टोळंबी आढळते ती वेचून फोडून घेत आतील गाभा वाळवून तेल गाळतात. पावसाळ्यात शेतकरी बांधवांचे पाय नेहमीच ओले होत असल्याने बोटातील भागात जखम तयार होते. गांडोळ्या (चिखल्या) येतात मोहाचे तेल लावल्याने जखम भरून निघते व त्वचा कोरडी पडते.

**७. झारझुरा**

ही भाजी उन्हाळ्यात नदी, ओहळाच्या ठिकाणी पाण्याच्या गाळात वाढते पानांची भाजी बनवली जाते.

**८. कुहरूळा( कांचन)**

उन्हाळ्यात कुहरूळा झाडाची पालवी पुर्ण गळून पडते झाडाला नवी पालवी फुटते त्याची भाजी बनवली जाते.

**९. भोकरीची भाजी**

उन्हाळ्यात इतर झाडं पानांनी पुर्ण खकरून जातात अशावेळी भोकरीचं झाड मात्र पुर्ण फुलांनी बहरून जाते न फुललेल्या कच्च्या निळ्या कळ्या पासून भाजी व चटणी,मुटके बनवले जाते ती अतिशय रुचकर लागते भोकरीच्या भाजीने पोटातील आजार बरे होतात.आदिवासी डोंगराळ भागातील रानभाज्या आहारातील वापरा बरोबरच आयुर्वेदिक महत्त्वही तितकेच आहे.

**सुभाष कामडी**
**(आदिवासी साहित्य अभ्यासक)**